❑ मुख्य संपादक ❑
अरविंद भंडारे

❑ संपादकीय मंडळ ❑
दिलीप सावंत
विशाल मोरे
रोहीणी जुवाटकर - भंडारे
शांतारामजी इंगळे
देवदत्त कांबळे
जगन्नाथ काळे

❑विधी सल्लागार ❑
अनिल वैद्य (माजी न्यायाधिश)

❑प्रकाशक ❑
पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई

❑सल्लागार मंडळ❑
नागसेन गमरे, अरुण वाघमारे, अरुण साळुंके, रॉकेश यादव, रामचंद्र सकपाळ, विश्वास सरोदे, प्रमोद पोळ

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
अरविंद भंडारे
५४/७८, बी. डी. डी. चाळ,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.
भ्रमणध्वनी: ९९६७६९२०१४

Email : paliresearchinstitute@gmail.com
Website : www.paliresearchinstitute.com

हे त्रैमासिक पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई यांनी खाजगी वितरणाकरीता छापून
**पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई**
५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. येथून प्रसिद्ध केले.
**या त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

**किंमत रु. ४०/-**
**वार्षिक वर्गणी रु. १६०/-**
**पंचवार्षिक वर्गणी रु. ८००/-**
**आजन्म वर्गणी रु. ५०००/-**

❑मुखपृष्ठ सजावट ❑
अमोल सुर्यकांत कांबळे

❑अक्षर जुळणी ❑
पी.सी.मॅन कम्प्युटर, दादर

*पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई चे मुखपत्र*

# बुद्धसासन

**त्रैमासिक**

वर्ष ३ रे अंक ११ वा जानेवारी ते मार्च, २०२१ बुद्धाब्द २५६४

## *अनुक्रमणिका*

✠ भगवान बुद्धांचे धातू अवशेष ३
- संपादकीय

✠ ‘व्होल्गा से गङ्गा या ग्रंथातून दिसणारे बुद्धकालीन समाजजीवन ५
- देवेंद्र उबाळे

✠ सम्राट अशोकांचा कालसी शिलालेख १०
- अशोक तपासे

✠ महाधम्मप्रचारक व बौद्धदर्शन शास्त्राचे अभ्यासक आदरणीय मा. शं. मोरे साहेब १५
- अनिलकुमार पाटील, अहमदाबाद

✠ भिक्खू आणि भिक्खूणी संघ १७
- डॉ. विद्यावती मालविका, “साहित्यरत्न”

✠ पालि वाङ्मयात वर्णित अर्थव्यवस्था २२
- डॉ. अरविंद कुमार सिंह

### वर्गणीदारांना विशेष सुचना

वार्षिक वर्गणी/आजन्म वर्गणी - पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - १८ या पत्त्यावर मनिऑर्डरने किंवा बँक खात्यावर जमा करु शकता.

**Bank Name :** ABHYUDAYA CO. OP. BANK LTD.
**ACCOUNT NAME:** PALI RESEARCH INSTITUTE MUMBAI
**AC NO. :** 013011100064813
**BRANCH:** WORLI
**IFSC CODE:** ABHY0065013
**GOOGLE PAY NO.:** 9967692014

वर्गणीदारांना अंक स्पीड पोस्टने घरपोच हवा असल्यास संपादकांना फोन करुन स्पीड पोस्ट चार्जेस विचारुन पाठविणे.

वर्गणीदारांनी नुतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठविताना आम्हांस सूचित करावे.

# पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा

पालि भाषेचा प्रचार व प्रसार जन सामान्यांपर्यंत व्हावा या सद्हेतूने स्थापन झालेल्या पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबईच्या वतीने दोन दिवसांची पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा वेगवेगळ्या शहरात/ गावात घेतली जाणार आहे.
तरी पालि भाषा व ब्राह्मी लिपी प्रेमी यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य फायदा घ्यावा.
कार्य शाळेची फी नाममात्र असेल.

अधिक माहितीसाठी खालील भ्रमणध्वनीद्वारे किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

Email : paliresearchinstitute@gmail.com
Web : www.paliresearchinstitute.com

**अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४**

प्रिय, जाहिरातदार,

सप्रेम जय भिम,

उपरोक्त संस्थेच्या वतीने पालिभाषेचा पर्यायाने बौद्ध धम्माचा प्रचार सर्वसामान्यांपर्यंत व्हावा. या हेतुने बुद्धसासन नावाचे त्रैमासिक सुरू केले आहे. हे त्रैमासिक पालि भाषेचा, बौद्ध धम्माचा इतिहास, आदर्श संस्कृती, कला, वाङ्‌मय व तत्वज्ञान इत्यादिंना संपूर्ण वाहिलेले आहे. तसेच त्यात महिला व तरूण यांच्यासाठी वेगळे सदर असतील. आपल्या सारख्या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांनी या त्रैमासिकात आपली जाहिरात प्रसिद्ध करून व वार्षिक/आजन्म सभासद बनून समाज प्रबोधनाच्या या कार्यात सहभागी व्हावे हीच आपणांस नम्र विनंती.

आपण जाहिरात देऊन या पवित्र कामास हातभार लावाल ही खात्री आहे.

**जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| **पान** | **दर रूपये** |
|---|---|
| मुखपृष्ठ बाहेरील (रंगीत ) | ४,०००/- |
| मलपृष्ठ आतील (रंगीत ) | ३,०००/- |
| संपूर्ण आतील पान | २,०००/- |
| अर्धे पान | १,०००/- |
| पाव पान | ५००/- |

**आपला धम्मबंधू**
**संपादक**

## संपादकीय

### भगवान बुद्धांचे धातू अवशेष

भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर कुशिनगर येथे त्यांच्यावर अग्निसंस्कार केले गेले. त्यानंतर जे धातू अवशेष शिल्लक राहिले त्यावर तथागतांच्या संबंधित असलेले जवळचे राजे महाराजे आपला अधिकार सांगू लागले व युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. वेळीच द्रोण नावाच्या ब्राह्मणाने मध्यस्थी करुन त्या धातू अवशेषांचे आठ भाग केले व ते प्रत्येकी-

१. मगधनरेश अजातशत्रू
२. अल्लकप्पचे बुली
३. रामग्रामचे कोलिय
४. पावाचे मल्ल
५. वेठद्विपचे ब्राह्मण
६. कुशीनाराचे मल्ल
७. कपिलवस्तूचे शाक्य
८. वैशालीचे लिच्छवी

यांना मिळाले व त्यांनी त्यावर शारीरिक स्तूपाचे निर्माण कार्य केले. त्यानंतर सम्राट अशोक उत्पन्न झाल्यावर त्यांनी बुद्ध धम्माचा स्विकार करुन वरीलपैकी सात स्तुपातून (रामग्राम चा वगळता) भगवान बुद्धांच्या धातूरक्षा बाहेर काढून त्याचे भाग करुन त्या संपूर्ण जम्बूद्विपात धम्माच्या प्रचारार्थ पोहचवल्या, त्यावर स्तूप, विहारे उभी केली.

आज २२०० वर्षानंतर सम्राट अशोकांनी उभारलेले अनेक स्तूप व विहारे नष्ट झाली आहेत काही ठिकाणी ती मोडकळीस आली आहेत तर बोधगया, सारनाथ, कुशिनगर, लुंबिनी आदि ठिकाणावरील विहारे, स्तूप ब्रिटिश अभ्यासकांमुळे व भारतीय पुरातत्व खात्यामुळे आज पुन्हा पुनर्स्थापित करुन जतन केली जात आहेत.

१९ व्या शतकात ब्रिटीश अधिकारी अलेक्झांडर कनिंगहम यांनी भारतीय पुरातत्व खात्याची स्थापना करुन प्राचीन बौद्ध स्थळांच्या शोधकार्यात उल्लेखनिय कामगिरी केली. अनेक बौद्ध स्थळांचा व तेथे असलेल्या भगवान बुद्धांच्या धातूरक्षेचा शोध लागल्यानंतर त्या सुरक्षित राहाव्यात म्हणून इंग्लंड व भारतातल्या प्रमुख वस्तु संग्रहालयात त्या सुरक्षित ठेवण्यात आल्या. २० व्या शतकात भारतात प्राचीन बौद्ध स्थळांवर मोठ मोठी बौद्ध केंद्रे निर्माण झाल्यानंतर पुन्हा त्याठिकाणी त्या धातुरक्षा पुनर्स्थापित करण्यात आल्या व तेथून त्या जगभरातील विहारात व ध्यान केंद्रात पोहचल्या.

पुढे आपण थोडक्यात भारतासह विदेशात कुठे कुठे भगवान बुद्धांच्या धातुरक्षा मिळाल्या आहेत व पोहचल्या आहेत याचा आढावा घेणार आहोत.

१. **पिप्रहवा :** १८९८ साली ब्रिटीश अधिकारी विलियम पेपे यांनी उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात बिरदपूर येथे या स्थळाचा शोध घेतला. तेथे त्यांना एक धातुरक्षा कलश सापडला त्यावर ब्राह्मी लिपीत एक लेख अंकीत होता. त्या लेखावरुन तो बुद्धांचा धातूरक्षा कलश आहे हे स्पष्ट झाले. ते स्थळ प्राचीन कपिलवस्तु आहे असा अंदाज काही भारतीय पुरातत्वज्ञांनी तेथे सापडलेल्या इतर अवशेषांच्या आधारे मांडला आहे. ह्या धातुरक्षा आज नॅशनल म्युझियम, दिल्ली येथील प्राचीन वस्तु संग्रहालयात आहे.

२. **देवनी मोरी :** गुजरात मधील अरवली जिल्ह्यात शामलजी येथून २ किमी अंतरावर देवनी मोरी येथे प्राचीन बौद्ध संघरामाचे अवशेष आहेत. येथे देखील भगवान बुद्धांचा धातुरक्षा कलश प्राप्त झाला आहे जो आज महाराजा सयाजीराव गायकवाड बडोदा विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाच्या संग्रहालयात आहे.

३. **धम्मराजीक स्तूप (सारनाथ) :** सारनाथ येथील धम्मेक स्तूपासमोर आपल्याला ज्या स्तूपाचे फक्त अवशेष पाहायला मिळतात तो देखील एक धम्मराजीक स्तूपच होता. धम्मराजीक हा शब्द धम्मराजा या शब्दाशी निगडीत आहे. धम्मराजा म्हणजेच भगवान बुद्ध. या स्तूपातून बनारसचा राजा चेतसिंह याच्या कार्यकाळात एक धातुरक्षा कलश प्राप्त झाला होता जो राजाच्या मुनीमने कोणा महान साधूच्या अस्थिरक्षा समजून गंगेत विसर्जित केल्या व स्तूप ढासळवून त्याच्या विटा बनारस घाट व बाजार याची निर्मिती करण्यासाठी उपयोगात आणल्या.

४. **सांची :** सांची येथील महास्तूपा समोरील स्तूप क्र. ३ चे अलेक्झांडर कनिंगहम व फेड्रीक मेसे यांच्याद्वारे उत्खनन सुरु असताना स्तूपाच्या दक्षिण व उत्तर बाजूला दोन दगडी पेट्या सापडल्या ज्यात धातू करंडकात भगवान बुद्धांचे पट्टशिष्य सारिपुत्त व मोगल्लान यांच्या धातूरक्षा प्राप्त झाल्या. त्या दगडी पेट्यांवर **सारिपुत्तस व मोगल्लानस** हे शब्द ब्राह्मी लिपीत कोरले असल्यामुळे ते त्यांचेच धातू आहेत या प्रमाणाला बळकटी मिळाली. बौद्ध सिद्धांतानुसार महास्तूपात भगवान बुद्धांचे धातू होते हे देखील त्यांच्या प्रमुख शिष्यांच्या डावी व उजवीकडे मिळालेल्या धातू

अवशेषांवरुन सिद्ध झाले. आज या दगडी पेट्या सांची वस्तु संग्रहालयात आपणास पाहावयास मिळतात. तर सारिपुत्त व मोगल्लान यांच्या धातुरक्षा इंग्लंडला संग्रहालयात बोटीने पाठविताना बोटीला अपघात होवून समुद्रात विलीन झाल्या.

५. **सतधारा :** सतधारा येथील मुख्यस्तूपाच्या समोर असलेल्या स्तूप क्र. २ मधून सुद्धा सारिपुत्त व मोगल्लान यांच्या धातुरक्षा प्राप्त झाल्या आहेत ज्या आज सांची येथील चेतीयगिरी विहारात स्थापित करण्यात आल्या आहेत. येथील मुख्यस्तूपात सुद्धा भगवान बुद्धांच्या धातूरक्षा होत्या.

६. **सोनारी :** सोनारी स्तूप हे सांचीपासून साधारण २५ किमी वर असलेले ठिकाण आहे. याठिकाणी आपणास ८ स्तूप पाहावयास मिळतात ज्यातील स्तूप क्र. २ मधून धातुरक्षा प्राप्त झाल्यात. आज ह्या धातुरक्षा विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम, इंग्लंड येथे सुरक्षित आहेत.

७. **भोजपुर :** सांची येथून १८ किमी अंतरावर भोजपुर (मुरेलखुर्द) स्तूप समूह आहे. १८५१ साली अलेक्झांडर कनिंगहम व मेसे यांनी येथे स्तूप क्र. २ मधून एक धातुरक्षा करंडक प्राप्त केला जो आज विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम इंग्लंड येथे आहे.

८. **अंधेर :** भोजपुर स्तूप समूहापासून साधारण ५ किमी अंतरावर हा स्तूप समूह आहे. येथे देखील धातुरक्षा कलश प्राप्त झाला आहे.

९. **ललितगिरी :** ओरिसा येथील ललितगिरी येथे प्राचीन बौद्ध संघारामाचा शोध १९२७ साली लागला. येथील महास्तूपातून भगवान बुद्धांचा धातूकलश प्राप्त झाला आहे.

१०. **भात्तिप्रोलू :** भात्तिप्रोलू हे आंध्रप्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील गाव आहे. १९७० साली या स्थळाचा शोध लागला असून येथील ४० मी. वर्तुळाकार आकाराच्या स्तूपात बुद्धांचे शरीर धातू असलेला करंडक प्राप्त झाला. या करंडकावर तामिळ-ब्राह्मी लिपीत लेख अंकित आहे. सदर कलश व धातुरक्षा मद्रास म्युझियम येथे ठेवण्यात आल्या आहेत. आज मुंबईतील जगप्रसिद्ध **ग्लोबल विपश्यना पॅगोडा** मध्ये याच स्तूपातून प्राप्त झालेल्या धातू स्थापित करण्यात आल्या आहेत.

११. **नालासोपारा :** मुंबई जवळील उपनगरात नालासोपारा या प्राचीन बंदराजवळ आपणास अशोककालीन स्तूप पाहावयास मिळतो ज्याचे उत्खनन १८९२ साली पंडित भगवानदास इंद्राजी यांनी केले होते. तेथे स्तूपासोबतच अशोकांचा शिलालेख व भगवान बुद्धांचा धातूकलश प्राप्त झाला होता.

१२. **धम्मराजीक स्तूप (तक्षशिला) :** आजच्या पाकिस्तानातील रावळपिंडी जवळ प्राचीन तक्षशिला विद्यापीठाचे अवशेष व संघाराम आहे. सर जॉन मार्शल यांनी १९१८ साली येथे उत्खनन करुन बरेच प्राचीन बौद्ध अवशेष व भगवान बुद्धांचा धातू कलश प्राप्त केला. सर जॉन मार्शल यांनी तक्षशिला येथे उभारलेल्या प्राचीन वस्तू संग्रहालयात हे धातू अवशेष ठेवण्यात आले आहेत.

१३. **अफगाणिस्तान :** अफगाणिस्तानाच्या जलालाबाद जिल्ह्यात बिमारण येथे पुरातत्वज्ञ चार्ल्स मेसन यांनी बिमारण येथील स्तूपाचे उत्खनन केले असता स्तूप क्र. २ मधून त्यांना बुद्धांचा धातूकरंडक प्राप्त झाला. एका बाजूला शक्र (इंद्र), एका बाजूला ब्रह्म व मध्यभागी भगवान बुद्ध असा गांधार शैलीतील करंडक आज ब्रिटिश म्युझियम मध्ये सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

१४. **बांग्लादेश :** आजचा बांग्लादेश पूर्वी बंगालचा भाग होता म्हणजेच जम्बूद्विपाचा भाग होता. आज ही येथे मोठ्या संख्येने बौद्ध संघाराम आहेत. बांग्लादेशातील बंदरबन हे बौद्ध वस्ती असलेले ठिकाण आहे. येथे म्यानमारच्या पुढाकाराने एक पॅगोडा उभारण्यात आला आहे व त्यात बुद्धांच्या धातूरक्षा स्थापित करण्यात आल्या आहेत ज्याला **बुद्ध धातू जडी** असे संबोधले जाते.

प्राचीन जम्बूद्विपातील या भागांसहित आज संपूर्ण जगात उदा. अमेरिका, जापान, इंडोनेशिया, कोरिया, लाओस, म्यानमार, मलेशिया, मंगोलिया, थायलंड, व्हिएतनाम, श्रीलंका, नेपाळ, इराण, भूतान, रशिया, सिंगापुर, तिबेट इत्यादी देशात सुद्धा भगवान बुद्धांच्या धातुरक्षा पोहचल्या आहेत व तेथे त्यावर मोठे संघाराम, विहार, ध्यान केंद्र उभारण्यात आले आहेत.

**तथागत पब्लिकेशन्स्**

*- प्रोपा. अरविंद भंडारे*

संपर्क - ९९६७६९२०१४

**व्हिजन प्रॉपर्टी मॅनेजमेंट**

*- प्रोपा. रोहिणी अरविंद भंडारे*

संपर्क - ८४८४०६७०१६

# 'व्होल्गा से गङ्गा या ग्रंथातून दिसणारे बुद्धकालीन समाजजीवन

*- देवेंद्र उबाळे, ९४२२९४५९४३*
anvayarth@gmail.com

महापंडित राहुल सांकृत्यायन यांनी भारतीय साहित्यात अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. त्यांनी पुरातन भारतीय समाजजीवनाच्या विविध अंगांवर प्रकाश टाकून इतिहासाची नव्याने मांडणी केलेली आहे. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांना ऐतिहासिक संदर्भ आहेत. त्यांचे लेखन उत्खननात सापडलेल्या अस्सल दस्तावेजांवर आधारित आहे. त्यांच्या अंगी असलेली संशोधनवृत्ती आणि चिकित्सक दृष्टी त्यांच्या कथासाहित्य, भाषाशास्त्र, व्याकरण, कोशवाङ्मय, लिपीशास्त्र, प्रवासवर्णन, अनुवाद हस्तलिखित-लिप्यांतरण, इतिहास, राजकारण, तत्वज्ञान अशा अनेक साहित्य प्रकारांमधून आविष्कृत झालेली आहे. राहुलजींनी लिहिलेला 'व्होल्गा से गङ्गा' हा कथासंग्रह भारतीय कथा साहित्यातील मैलाचा दगड ठरावी अशी कलाकृती आहे. विवस्त्र अवस्थेत वावरणाऱ्या अप्रगत मानवापासून आजच्या विकसित मानवसमाजापर्यंतच्या महत्वपूर्ण टप्प्यांचा आढावा या ग्रंथात घेतलेला आहे. एकूण वीस कथांमध्ये हा संपूर्ण प्रवास त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडलेला आहे. ह्या सर्व कथानकांसाठी वापरलेले संदर्भग्रंथ व आधारसामुग्री वास्तव आणि जनमानसात मान्यता पावलेली आहे. ह्या कथा लिहिताना अनेक धर्मग्रंथ, ऐतिहासिक दस्तावेज, उत्खननात सापडलेले अस्सल पुरावे, पुरातन हस्तलिखिते, मौखिक परंपरा अशा विविध साधनांचा आधार घेतलेला असल्यामुळे या कथांना इतिहास ग्रंथाचा दर्जा मिळालेला आहे. याच आधारावर 'व्होल्गा से गङ्गा' या ग्रंथातून दिसणाऱ्या बुद्धकालीन समाजजीवनाचा आढावा घेण्याचा प्रयास प्रस्तुत विवेचनात केला आहे.

**'व्होल्गा से गङ्गा' मधील बुद्धकाळ**

राहुल सांकृत्यायन यांच्या मते, शाक्यमुनि गौतम बुद्धांचा जन्म कपिलवस्तु येथे इ.स.पू. ५६३ मध्ये झाला. वयाच्या ३५ व्या वर्षी इ.स.पू. ५२८ मध्ये त्यांना सम्यक सम्बोधी प्राप्त झाली. अल्पकाळातच बुद्धविचारांनी जम्बुद्विपावर **'न भूतो न भविष्यति'** असे गारुड केले, ज्याचा प्रभाव दीर्घकाळ चालत आलेला आहे. इ.स.पू. सहावे शतक हा बुद्धकाळाचा प्रारंभ आहे. 'व्होल्गा से गङ्गा' या कथासंग्रहातील **'बन्धुल मल्ल'** ही कथा बुद्धकालीन समाजजीवनावर प्रकाशझोत टाकते. इ.स.पू. ४९० च्या जवळपासचा काळ या कथेत चित्रित करण्यात आलेला असल्यामुळे या कथेतील तपशील बुद्धकाळाचे प्रतिनिधित्व करणारा आहे.

**राजकीय स्थिती**

बुद्धकाळात छोट-छोटी गणराज्ये होती. ज्यांना महाजनपद असे म्हटले जाई. बुद्धकालीन राजकीय व्यवस्थेचे वर्णन करताना 'The Buddha and His Dhamma' या ग्रंथात म्हटले आहे,

*एका राजाची सत्ता असलेली राज्ये संख्येने एकूण सोळा होती. त्यांची नावे अंग, मगध, काशी, कोशल, वज्जी, मल्ल, चेदी, वत्स, कुरु, पांचाळ, मत्स्य, सौरसेन, अश्मक, अवंती, गांधार आणि कंबोज ही होत. राजाची सत्ता नसलेल्या राज्यांमध्ये कपिलवस्तुचे शाक्य, पावा आणि कुसिनाराचे मल्ल, वैशालीचे लिच्छवी, मिथिलेचे विदेह, रामग्रामचे कोलीय, अलकप्पाचे बुली, रासपुत्तचे कलिंग, पिप्फलवनाचे मौर्य आणि सुंसुमार पर्वताची राजधानी असलेले भग्ग यांचा समावेश होतो. एका राजाची सत्ता असलेल्या राज्यांना जनपद म्हटले जाई व एका राजाची सत्ता नसलेल्या राज्यांना संघ किंवा गण म्हटले जाई'*

गणराज्यांच्या प्रमुखपदी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती काही ठराविक काळापुरती केली जाई. ही नियुक्ती करण्याचा अधिकार गणपरिषदेस असे. प्रत्येक सज्ञान व्यक्ती त्या गणपरिषदेची सदस्य असे. गणपरिषद सर्वानुमते गणप्रमुखाची निवड करीत असे. ही निवड करताना त्या व्यक्तीच्या गुणांचा विचार केला जाई. जी व्यक्ती सर्वपसंत असेल, अशा व्यक्तीला गणप्रमुख म्हणून निवडण्यात येई. 'व्होल्गा से गङ्गा' या कथेतील नायक-नायिकेच्या संवादात गणप्रमुखाच्या निवडीचा संदर्भ येतो.

*'क्योंकि वह मुझे सर्वप्रिय होते देखते है, और गण (प्रजातंत्र) में सर्वप्रियके डाह करनेवाले अधिक पाये जाते है, सर्वप्रियता हीसे तो यहाँ पुरुष गण-प्रमुख होता है'*

म्हणजेच गण-प्रमुख बनण्याकरिता सर्वप्रियता आवश्यक होती. आधुनिक काळात ज्याप्रमाणे

---

1. The monarchical State were altogether sixteen in numbers. They were known by the name of Anga, Magadha, Kasi, Kosala, Vriji, Malla, Chedi, Vastsa, Kuru, Panchala, Matsya, Saursena, Asmaka, Avanti, Gandhara and Kambhoja.

The non-monarchical States were those of the Sakyas of Kapilvatsu, the Mallas of Pava and Kushinara, the Lichhavis of Vaisali, the Videhas of Mithila, the Koliyas of Ramgam, the Bulis of Allakapa, the Kalingas of Rasaputta, the Mauriyas of Pipphalvana and the Bhaggas with their capital of Sumsumara Hill.

The monarchical States were known as Janapada and the non-monarchical as Sangh or Gana (Ambedkar, 1984)

सर्वाधिक मते मिळविणारी व्यक्ती संसदेत निवडून दिली जाते, तशीच पद्धती बुद्धकाळातही असावी, असे दिसते.

गणप्रमुख हा राज्याचा शासक असला तरी, कोणताही मोठा निर्णय घेताना मतदानाद्वारे सार्वमत घेण्याची पद्धत बुद्धकाळात प्रचलित होती. जनमताचा कौल घेण्याकरिता लोकशाही पद्धतीने मतदान घेतले जाई, त्याकरिता मतदान करण्याची निश्चित स्वरुपाची प्रक्रिया अस्तित्वात होती. मतदानाच्या सुरुवातीला सूचना मांडली जाई, त्यास **'ज्ञप्ति'** म्हणत. त्यानंतर तीनदा **'अनुश्रवण'** केले जाई. जर कोणाचा विरोध नसेल तर ती **'ज्ञप्ति'** मंजूर होऊन तिचे ठरावात रुपांतर केले जाई. ठरावास धारणा म्हटले जाई. मात्र कुणाला **'ज्ञाति'** मंजूर नसेल तर त्यावर मतदान होवून मग बहुमताच्या बाजूने धारणा निश्चित केली जाई. या मतदान पद्धतीला **'छन्द'** असे म्हटले जाई. ही छन्द पद्धती भगवान बुद्धांनी त्यांच्या संघाच्या कार्यप्रणालीतही रुढ केलेली दिसते. प्रथम धम्मसंगीती संदर्भात मांडलेल्या प्रस्ताव व ठरावाबाबत विनयपिटकाच्या पञ्चसतिकक्खन्धकात तपशील आढळतो.

*' मग आयुष्मान महाकस्सपांनी संघास निवेदित केले-*
*'आयुष्मान संघाने माझा प्रस्ताव ऐकावा,*
*संघास जर योग्य वाटत असेल तर संघाने या*
*पाचशे भिक्षुंना राजगृहात वर्षावास करीत असताना*
*धम्म आणि विनयाने संगायन करण्यास संमती द्यावी.*
*असा प्रस्ताव (ज्ञप्ति) आहे.'*

*'आयुष्मान संघाने माझा प्रस्ताव ऐकावा,*
*संघाने या पाचशे भिक्षुंना राजगृहात वर्षावास करीत*
*असताना धम्म आणि विनयाने संगायन करण्यास*
*संमती द्यावी हा प्रस्ताव ज्यांना मान्य असेल*
*त्यांनी मौन रहावे, ज्यांना अमान्य असेल त्यांनी बोलावे.'*

*'ज्याअर्थी संघ मौन आहे, त्याअर्थी या पाचशे भिक्षुंनी राजगृहात*
*वर्षावास करीत असतना धम्म आणि*
*विनयाचे संगायन करावे या प्रस्तावास संघाची मंजूरी आहे असा*
*ठराव (धारणा) करण्यात येत आहे.'*

धम्मसंगीती घेण्याचा हा प्रस्ताव मांडल्यावर सर्वांनी मौन राहून संमती दर्शवली व त्या प्रस्तावाचे ठरावात रुपांतर झाले. मात्र जर संघातील एखाद्या भिक्षुने विरोध दर्शविला असता तर त्याकरिता मतदान घेतले गेले असते. **'व्होल्गा से गङ्गा'** मध्ये एका प्रसंगात निर्णय घेण्याकरिता मतदान घेतल्याचा संदर्भ येतो. बन्धुल मल्लच्या उप-सेनापतिपदी निवडीच्या प्रस्तावास आयुष्मान रोज याने विरोध दर्शविला, त्यामुळे गणपरिषदेत मतदान घ्यावे लागले. या प्रसंगात मतदानाच्या संपूर्ण प्रक्रियेचे वर्णन केलेले आहे.

---

३.'अथ खो आयस्मा महाकस्सपो सङ्घं ञापेसि-

'सुणातु मे, आवुसो, सङ्घो। यदि सङ्घस्स पत्तकल्लं, सङ्घो इमानि पञ्च भिक्कुसतानि सम्मेन्नेय्य०एसा ञत्ति।

'सुणातु मे, आवुसो, सङ्घो। इमानि पञ्च भिक्कुसतानि समन्नति० यस्सायस्मतो खमति इमेसं पञ्चन्नं भिक्खुसतानं सम्मुति-सो तुण्हस्स; यस्स नक्खमति, सो भासेय्य।

'सम्मतानि सङ्घेन इमानि पञ्च भिक्कुसतानि राजगहे वस्सं वसन्तानि धम्मञ्च विनयञ्च सङ्गायितुं० खमति सङ्घस्स, तस्मा तुण्ही, एवमेतं धारयामी ति।' *(विनयपिटक, चुल्लवग्ग, पञ्चसतिकक्खन्धक)*

*'भन्ते गण ! सुनै। गणका आयुष्मान् बन्धुलके उप-सेनापति बनाये जानेमें थोडा-सा मतभेद है, इसलिए छन्द (वोट) लेनेकी जरुरत है शलाका-ग्रहापक (शलाका बाँटनेवाले) छन्द शलाकोओं (वोटकी काष्ठमय तीलियों) को लेकर आपके पास जा रहे है। उनके एक हाथ की तीलियाँ लाल शलाकाएँ है, दूसरी काली। लाल शलाका 'हाँ' के लिए है, काली 'नही' के लिए। जो आयुष्मान् रोजके मतके साथ हों, मूल ज्ञप्ति (प्रस्ताव) को स्वीकार नहीं करते, वह काली शलाका लें, जो मूल ज्ञप्ति को स्वीकार करते है। वह लालको'* ।

अशाप्रकारे मतदानाद्वारे बहुमताचा कौल घेऊन निर्णय घेतला जाई. लोकशाही पद्धतीची ही प्रारंभिक अवस्था होती. ''व्होल्गा से गङ्गा' मधून बुद्धकालीन राजकीय स्थितीची कल्पना या प्रसंगातून येते.

**स्त्री-पुरुष समानता**

बुद्धकाळ स्त्री-पुरुष समानतेचा काळ होता. भगवान बुद्धांच्या संघात पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही गृहत्याग करुन भिक्षुणी झाल्याचे सर्वश्रुत आहे. त्याकाळी स्त्रीकडे स्वत:ची आर्थिक संपत्ती असे व त्या संपत्तीचा उपभोग आणि विनियोग करण्याचे स्वातंत्र्य त्या स्त्रीला असल्याचे बुद्धकालीन साहित्यातून दिसते. त्याकाळात स्त्रीसुद्धा पुरुषाप्रमाणेच सर्व प्रकारच्या कामात सहभागी होत असे. अंगी क्षमता असल्यास कोणतेही क्षेत्र स्त्रीकरिता वर्ज्य नव्हते. शिकारीसारख्या क्षेत्रातही स्त्रिया मागे नव्हत्या, त्याही पुरुषांप्रमाणेच शिकार करीत असल्याचा संदर्भ **'व्होल्गा से गङ्गा'** मध्ये सापडतो.

*'सभी तरुण मल्ल-मल्लियाँ शिकारी वेश में तैयार इस जोडेकी प्रतिक्षा कर रहे थे, और इनके आते ही धनुष, खड्ग भालेको सँभाल चल पडे।*

पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही शिकारीचे प्रशिक्षण घेतलेले असे व त्याही घोड्यावर बसून शिकार करीत असत. असाच संदर्भ राहुल सांकृत्यायन यांच्या **'सिंह सेनापति'** या कादंबरीतही आढळतो. या कादंबरीतील एका प्रसंगात युद्धापुर्वीच्या तयारीचे वर्णन केलेले आहे. त्यावेळी कादंबरीची नायिका रोहिणी नायकास म्हणते,

*'हम तक्षशिलीय तरुणियाँ भी अपने को तैयार कर रही है। जैसे तक्षशिला के बालक को पहले-पहल मधु खड्ग की नोक पर चाटने को मिलती है, उसी तरह बालिका को भी तक्षशिला के नर-नारी समान रुप से आयुध-सेवी बनाते है'* ।

यावरुन असे दिसते की, पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शस्त्र-प्रशिक्षण दिले जात होते.

**धार्मिक मतप्रवाह**

बुद्धकाळात धार्मिक मतांबाबत विविधता असल्याचे निदर्शनास येते. इ.स.पु. सहाव्या शतकात भारतात अनेक मतमतांतरांचे पंथ व त्यांचे अनुयायी होते. पालि साहित्यात यासंबंधी अनेक संदर्भ सापडतात. **'दीघनिकाय'** या ग्रंथातील ब्रह्मजालसुत्तात त्याकाळी रुढ विविध मतप्रवाहांची माहिती दिलेली आहे व सामञ्ञफलसुत्तात तत्कालीन प्रमुख धर्माचार्यांची मते दिसून येतात. त्याकाळात धर्माचार्यांचा प्रभाव दिसत असला तरी त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झाल्याचे आढळून येत नाही. भगवान बुद्धांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केल्याचे अङ्गुत्तरनिकायमधील केसमुत्तिसुत्तात दिसते. **'कालामसुत्त'** नावाने प्रसिद्ध असलेला हा उपदेश 'व्यक्ती स्वातंत्र्याचा जाहीरनामा' म्हणूनही प्रसिद्ध आहे. या सुत्तात म्हटले आहे की,

'कालामांनो, एखादी गोष्ट केवळ सर्वमान्य आहे, परंपरागत आहे, विशिष्ट प्रकारे सांगितलेली आहे, धर्मग्रंथानुसार आहे, तर्कसंगत आणि अनुमानसंगत आहे, तिच्या कारणांची चिकित्सा केलेली आहे, आपण अनुमोदन दिलेले आहे, सांगणाऱ्याचे व्यक्तिमत्व भव्य आहे, सांगणारी व्यक्ती आपल्याकरिता पूजनीय आहे म्हणून त्या गोष्टीचा स्विकार करु नका. ज्या गोष्टींचा स्वानुभव घेवुन तुमची खात्री झाली आहे की, ह्या गोष्टी अकुशल आहेत, सदोष आहेत, विद्वानांनी निंदा केलेल्या आहेत, ह्या गोष्टींचा अवलंब केल्यास अहित होणार आहे. ह्या दु:खास कारणीभूत ठरणाऱ्या आहेत, तेव्हा कालामांनो ! तुम्ही त्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे.'

**'व्होल्गा से गङ्गा'** या ग्रंथातही बुद्धकालीन धार्मिक मतप्रवाहांची माहिती मिळते. विविध मतप्रवाहांची चर्चा करताना असा संदर्भ येतो की,

*'अब यह वह समय था, जब कि देशोंमें स्वतंन्त्र चिन्तनकी एक बाढ-सी आ गई थी, और विचारक (तीर्थंकर) अपने-अपने विचारों को लोगोंके सामने साधारण सभाओंमें रखते थे।- कहीं उसका रुप साधारण उपदेश अपवाद, सूक्य के रुपमें होता था, कहीं कोई वादके आहवान (चेलेंज) को घोषणाके तौरपर जम्बू (जामुन) की शाखा गाडते घूमता फिरता'*

त्याकाळी प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा पूर्ण अधिकार होता. समाजात विचार स्वातंत्र्य रुढ करण्यात बुद्धविचारांचे मोलाचे स्थान असल्याचे तत्कालीन साहित्यातून दिसते. 'व्होल्गा से गङ्गा' यातील विवेचनही हीच बाब अधोरेखित करते.

---

*७. 'एथ तुम्हे, कालामा! मा अनुस्सवेन, मा परम्पराय, मा. इतिकिराय, मा पिटकसम्पदानेन, मा तक्कहेतु, मा आकारपरिवितक्केन, मा दिट्ठिनिज्झानक्खन्तिया, मा भब्बरुपताय, मा समणो नो गरुति। यदा तुम्हे कालामा अत्तनाव जानेय्याथ- 'इमे धम्मा अकुसला, इमे धम्मा सावज्जा, इमे धम्मा विञ्ञुगरहिता, इमे धम्मा समत्ता समादिन्ना अहिताय दुक्खाय संवत्तन्तीति, अथ तुम्हे, कालामा, पजहेय्याथा ति, इति यं तु वुत्तं, इदमेतं पटिच्च वुत्तं।' (अङ्गुत्तरनिकाय, तिकनिपात, महावग्ग, केसमुत्तिसुत्त)*

**दासप्रथा**

बुद्धकाळात प्रचलित असलेल्या दासप्रथेचे विदारक चित्रण **'व्होल्गा से गङ्गा'** मध्ये दिसते. दासांची विक्री, त्यांचा अनन्वित छळ, त्यांचे पशुतुल्य जीवन याविषयीचा एक हृदयद्रावक प्रसंग राहुल सांकृत्यायन यांनी **'बन्धुल मल्ल'** या कथेत चितारला आहे.

*'तीन दिनकी भारी मेहनतके बाद आज जरा-सा अवकाश पा कुछ दास किसी घरके एक कोनेमें बैठे हुये थे। काकने कहा-*

*'हम दासोंका भी कोई जीवन है! आदमीकी जगह यदि बैठे पैदा हुए होते, तो अच्छा था; उस वक्त हमें मनुष्य जैसा ज्ञात तो न होता।'*

*'ठीक कहते हो काक! कल मेरे मालिक दंडपाणिने लाल लोहा करके मेरे स्त्रीको दाग दिया।'*

*'क्यों दागा ?'*

*'क्यों इनसे कौन पुछे! यह तो दासोंके पति-पत्नीके सम्बन्धको भी नहीं मानते। ... कसूर यही था की मेरी स्त्री कई दिनसे सख्त बीमार हमारी बच्चीकी बेहोशीकी बात मुझसे कहने आई थी। बेचारी बच्ची आखिर बची भी नहीं। अच्छा हुआ मर गई, संसार में उसे भी तो हमारे ही जैसा जीवन जीना पडता। सचमुच काक! हम दासोंका कोई जीवन नहीं है। इतना ही नही, हमारा कसाई, स्वामी कह रहा है कि इस चहल-पहल बीतते ही वह मेरी स्त्रीको बेच देगा।'*

*'तो उस कसाई दंडपाणिको लोहेसे दागनेसे भी सन्तोष नहीं आया?' 'नहीं भाई! वह कहता है कि बारह वर्ष बाद उस बच्चीके उसे पचास निष्क (अशर्फियाँ) मिलते। मानों, जान-बुझकर उसके पचास बर्बाद कर दिये।'*

उपरोक्त संवादातून तत्कालीन दासप्रथेचे विदारक वास्तव पुढे येते. बुद्धकाळात दासप्रथा प्रचलित होती. भगवान बुद्धांनीही दासांना भिक्षुसंघात प्रवेश देण्यापुर्वी त्यांच्या मालकाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचा नियम केला असल्याचे विनयपिटकाच्या महावग्गमधील महाखन्धकाच्या दासवत्थुमध्ये दिसते. **'व्होल्गा से गङ्गा'** मधील हृदयद्रावक प्रसंगाने बुद्धकाळातील जळजळीत सामाजिक वास्तव राहुल सांकृत्यायन यांनी अत्यंत ताकदीने मांडले आहे.

**नागरीकरण आणि व्यापार**

बुद्धकाळ आर्थिकदृष्ट्या समृद्ध असल्याचे अनेक दाखले बुद्धकालीन साहित्यात दिसतात. डॉ. भरतसिंह उपाध्याय यांनी लिहिलेल्या **'बुद्धकालीन भारतीय भुगोल'** या ग्रंथातही इ.स.पु. सहाव्या शतकातील अर्थव्यवस्थेचा व व्यापाराचा संदर्भ येतो.

*बुद्धकालीन भारत के अन्तर्देशीय व्यापार का विचार करने पर सर्वप्रथम चित्र जो हमारे सामने आता है वह है, माल (भण्डं) से भरी हुई ५०० गाडियों (पञ्चमत्तानि सकटसतानि) के काफिलों (शकट-सार्थ) को लिये हुए देश के एक कोने से दुसरे कोने को जाने वाले व्यापारियों का। इसप्रकार हम सूनापरान्त जनपद (ठाणा और सूरत के जिलों का अंश) के दो व्यापारी भाइयोंको क्रमश: ५००-५०० गाडियाँ लेकर श्रावस्ती व्यापारार्थ जाते देखते है।*

यातूनच बुद्धकालीन नागरीकरणाचा तपशीलही पहावयास मिळतो. तिपिटकातील अनेक सुत्तांमधूनही तत्कालीन नागरीकरणाची व आर्थिक सुबत्तेची उदहरणे दिसतात. सुवर्णभूमी (म्यानमार) येथील तपस्सु व भल्लिक हे दोन व्यापारी भगवान बुद्धांना भेटल्याचा उल्लेख विनयपिटकात आहे. 'व्होल्गा से गङ्गा' मध्येही बुद्धकालीन व्यापाराचा व नागरीकरणाचा संदर्भ दिसतो.

*'प्रसेनजितके राज्य में श्रावस्तीके अतिरिक्त साकेत (अयोध्या) और वाराणसी (बनारस) दो और महानगर थे। श्रावस्तीके सुदत्त (अनाथपिंडक) और मृगार, साकेतके अर्जुन जैसे कितने ही करोडपति सेठ काशी-कोसलके सम्मिलित राज्यमें बसते थे, जिनके सार्थ (कारवाँ) जम्बूद्वीप ही में नहीं बल्कि ताम्रलिप्तसे होकर पूर्व-समुद्र (बंगाल की खाडी) और भरुकच्छ (भडौच) तथा सुप्पारक (सोपारा) से होकर पश्चिम समुद्र (अरब सागर) द्वारा दूर दूरके द्वीपों तक जाते थे।*

वरील विवेचन बुद्धकालीन व्यापाराच्या संपन्नतेचे निदर्शक आहे. एकविसाव्या शतकात दिसणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रारंभ इसवीसनापुर्वीच झाला होता असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, अशाप्रकारे देशोदेशी पसरलेला व्यापार त्याकाळीच सुरु झाला होता.

**शिक्षण व लेखनकला**

बुद्धकाळात तक्षशिला विद्यापीठ शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. वैद्यकीय क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविणारा राजवैद्य जीवक याच तक्षशिला विद्यापीठाचा विद्यार्थी होता, हे सुविदित आहे. त्याचबरोबर त्याकाळात लेखनकथा अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावेही उपलब्ध आहेत.

लेखनकला व पत्रलेखन प्रचलित असल्याचे 'व्होल्गा से गङ्गा' मध्येही दिसते. बन्धुल मल्लला आपल्या राज्यात बोलावण्याकरिता कोसलराज प्रसेनजित वारंवार पत्र पाठवित असल्याचा उल्लेख येतो.

*'मल्लोंमें किसीको तक्षशिलामें इतना सम्मान मिला हो, आज तक नहीं सुना गया। क्या उन्हे मालूम नहीं कि आज भी*

*राजा प्रसेनजित् कोसलके लेख (पत्र) पर लेख तुझे बुलाने के लिए आ रहे है।*

यावरुनच बुद्धकाळात लेखनकला प्रचलित असल्याचे **'व्होल्गा से गङ्गा'** ह्या ग्रंथातून दिसते.

**समारोप**

महापंडित राहुल सांकृत्यायन यांनी लिहिलेल्या **'व्होल्गा से गङ्गा'** या कथासंग्रहातील **'बन्धुल मल्ल'** या कथेतून बुद्धकालीन समाजजीवनावर प्रकाशझोत टाकलेला आहे. या कथेत राजकीय, धार्मिक, सामाजिक विषयांबरोबरच नागरीकरण, व्यापार, शिक्षण व लेखनकला आदी अनेक विषयांचाही परामर्श घेण्यात आलेला आहे. या कथेत चित्रित केलेले प्रसंग बुद्धकालीन समाजव्यवस्थेवर आधारित असल्याचे तत्कालीन पालि व संबंधित इतिहास ग्रंथांमधून दिसत असल्यामुळे 'व्होल्गा से गङ्गा' या कथासंग्रहातून बुद्धकालीन समाजजीवनाचे दर्शन होते.

# आगामी धम्म अज्झयन चारिका - २०२१

**लुम्बिनी ते बोधगया -** २७ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२१ **पाहण्याची स्थळे :-** बुद्धगया, सारनाथ, राजगीर, नालंदा, कुशीनगर, कपिलवस्तु, श्रावस्ती, लुम्बिनी.
राहण्याची जेवण्याची सोय हॉटेलवर, मुंबई ते वाराणसी रेल्वे प्रवास स्लिपर (रु.१५,०००/-) व एसी क्लासने (रु.१७,५००/-)

**धर्मशाला -** मनाली, कुल्लू - १६ मार्च ते २४ मार्च २०२१ **पाहण्याची स्थळे :-** धर्मशाला - मनाली, कुल्लू. एकूण खर्च रु. १३,५००/-
राहण्याची जेवण्याची सोय हॉटेलवर, रेल्वे प्रवास एसी ३ टायर क्लासने

**लुम्बिनी ते बोधगया -** १८ मे ते २९ मे २०२१ **पाहण्याची स्थळे :-** बुद्धगया, सारनाथ, राजगीर, नालंदा, कुशीनगर, कपिलवस्तु, श्रावस्ती, लुम्बिनी.
राहण्याची जेवण्याची सोय हॉटेलवर, मुंबई ते वाराणसी रेल्वे प्रवास स्लिपर (रु.१५,०००/-) व एसी क्लासने (रु.१७,५००/-)

**सन्नती, नागार्जुन कोंडा, अमरावती (धान्यकटक) -** १ जुन ते ६ जुन २०२१, **पाहण्याची स्थळे :-** गुलबर्गा विहार, सन्नती, नागार्जुन कोंडा, अमरावती (धान्यकटक) रेल्वे व बस प्रवास एकुण खर्च रु. ७,०००/-

**सांची, मध्यप्रदेश :-** २५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२१, **पाहण्याची स्थळे :-** सांची स्तूप, चेतियगिरी विहार, सोनारी स्तूप, सतधारा स्तूप, कर्करेषा, विदिशा नगर येथील स्तंभ, उदयगिरी, भोजपूर (मुरेलखुर्द) स्तूप, अंधेर स्तूप राहण्याची जेवण्याची व्यवस्था हॉटेलवर, रेल्वे प्रवास. एकुण खर्च रु. ७,०००/-

**अधिक माहितीसाठी संपर्क**
**अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४ / शांतारामजी इंगळे - ९९६०७९६८२७**

# सम्राट अशोकांचा कालसी शिलालेख

*- अशोक तपासे*

भारतात सुमारे पस्तीस ठिकाणी सम्राट अशोकांचे शिलालेख व स्तंभलेख मिळाले आहेत. यांचे वर्गीकरण करायचे झाल्यास मुख्यत्वे शिलालेख व स्तंभलेख असे होते. त्यातही स्तंभलेखांचे विशाल स्तंभलेख व लघु स्तंभलेख असे दोन भाग होतात तर शिलालेखांचेही लघु शिलालेख व बृहद शिलालेख असे दोन भाग पडतात. लघु शिलालेखात एक अथवा दोन लहान शिळांवर लेख कोरलेले पहायला मिळतात. राजस्थानात बैराट म्हणजेच आजच्या विराट नगर शहरा जवळ सापडलेला शिलालेख वगळता उरलेल्या सर्व ठिकाणी जवळपास सारखाच मजकुर यात वाचायला मिळतो. कर्नाटकातील नित्तुर, उदेगोलम व रजुला मंदागीरी या ठिकाणी दोन शिळांवर तर अन्यत्र सर्व ठिकाणी एकाच शिळेवर हा मजकुर वाचायला मिळतो. सासाराम व अहरौरा या उत्तर भारतातील ठिकाणी तर रुपनाथ, गुजर्रा व सारु-मारु (सलकनपुर जवळ) या मध्य प्रदेशातील ठिकाणी प्रत्येकी एक एका शिळेवर लेख लिहिलेला आहे. ब्रह्मगिरी, सिद्दपुर, जतिंग- रामेश्वर आणि मास्कि या कर्नाटकातील ठिकाणी एक एका शिळेवर शिलालेख आहे.

बृहद शिलालेख म्हणजे एका फार मोठ्या शिळेवर मोठे व विस्तृत लेखन, बृहद शिलालेख गिरनार (गुजराथ), कालसी (उत्तराखंड), धौलि व जौगड (ओदिशा) या ठिकाणी अगदी नगण्य क्षतिग्रस्त लेखन पहायला मिळते. तर येरागुडी (कर्नाटक) येथे केवळ एक शिळा चंद्रलंबा देवीच्या मंदिर पुन:र्निमाणच्या वेळी उत्खननात मिळाली. सोपारा (मुंबई जवळ, महाराष्ट्र) येथे केवळ एक लहान शिळेचा तुकडा मिळाला आहे.

बृहद शिलालेखाची अधिक कल्पना गिरनार शिलालेखातुन येते. येथे हा संपूर्ण शिलालेख चौदा भागात विभागलेला दिसतो. हा प्रत्येक भाग एकेक चौकट आखुन कोरला आहे. या चौकटींमुळेच ही चौदा शिलालेखांची मालिका आहे हे समजते. अभ्यासकांनी या लेखांना नीट समजावून यांना तसे एक ते चौदा क्रमांक दिले आहेत. इतर सर्व ठिकाणी अशा चौकटी आखलेल्या दिसत नाहीत तर एका पाठोपाठ एक असेच सर्व शिलालेख कोरलेले दिसतात. या सर्व शिलालेखांचा मजकुरही बहु अंशी सारखाच आहे. तरीही सुक्ष्म अभ्यास केल्यास त्यातील स्थानिक भाषेचा अल्पसा फरक कळतो.

सम्राट अशोकांच्या शिलालेखांचा अभ्यास करताना बृहद शिलालेखांना समजुन घेणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण त्यांच्या लेखनातुन त्यांच्या मनोवृत्तीची व त्यांच्या महनीयतेची पुरेपुर कल्पना येते. अनेक अभ्यासक-विद्वान बृहद शिलालेखांची विस्तृत माहिती देताना गिरनार शिलालेख प्रमाण मानुन त्या अनुषंगानेच विस्तृत माहिती देतात. त्याचे एक कारण असे की, सुस्थितीतील लेखांपैकी हेच शिलालेख अतिशय स्पष्टपणे कोरलेले दिसतात. धौलि व जौगड या ठिकाणी एक ते दहा आणि चौदावा असे केवळ अकरा शिलालेख आहेत. अकरा, बारा व तेरा हे शिलालेख या ठिकाणी सम्राट अशोकांनी लिहीलेलेच नाहीत. सोपारा शिलालेखाचा जो तुकडा मिळाला आहे तो या मालिकेतील नववा शिलालेख आहे. सन्नति येथील शिलाखंडावर देखील सर्व चौदा लेख नाहीत. येरागुडी मध्ये सर्व लेख विखुरलेले आहेत व बरेचशे अस्पष्ट झाले आहेत. म्हणजे अभ्यास करण्यासाठी उरतात ते फक्त गिरनार व कालसी शिलालेख. या शिलालेखांची तुलना केल्यास गिरनार शिलालेख वाचनास अधिक सुटसुटीत आहे. कारण सर्व शिलालेख आखलेल्या चौकटीत आहेत. या लेखांच्या ओळी सुलभपणे वाचण्या इतपत लहान लहान आहेत. सर्व अक्षरे स्पष्ट आहेत. परंतु यातील पाचवा व तेरावा शिलालेख असलेला शिळेचा भाग तुटलेला आहे. त्यामुळे हे दोन्ही शिलालेख येथे पूर्णावस्थेत नाहीत. या उलट कालसी शिलालेखाची शिळा अखंड आहे. फक्त शिळेच्या दक्षिण पृष्ठभागावरील वरच्या दोन ओळी अस्पष्ट झाल्या आहेत. (या दोन ओळी तेराव्या लेखाच्या आहेत) अन्य सर्व लेखन सुस्थितीत आहे. पण या शिलालेखाचा वाचनाच्या दृष्टीने विचार केल्यास मात्र जी एक गोष्ट कठीण वाटते ती अशी की शिळेच्या पूर्व पृष्ठभागावर लिहीलेल्या ओळींची लांबी खुपच अधिक आहे. प्रत्येक ओळीत सरासरी शंभराच्या आसपास अक्षरे आहेत आणि हा शिलालेखाचा सर्वात मोठा भाग आहे. शिलालेख एक ते बारा क्रमाने आणि तेराव्या लेखाचा पुर्वार्ध पुर्व पृष्ठावर कोरलेला आहे. तेराव्या शिलालेखाचा उत्तरार्ध दक्षिण पृष्ठावर आहे व त्याच्या सुरवातीच्या फक्त दोन लहान ओळी क्षतिग्रस्त आहेत. चौदावा संपूर्ण शिलालेख दक्षिण पृष्ठभागावर सुस्थितीत आहेत. यावरुन एक गोष्ट निश्चित होते की सम्राट अशोकांच्या बृहद शिलालेखांचा सर्व मजकुर (ब्राह्मि लिपीत) नीट समजून घेण्यासाठी कालसी शिलालेखा शिवाय दुसरा यथायोग्य पर्याय नाही (पाकिस्तान मधील शहाबाजगढी या ठिकाणच्या शिलालेखात हा सर्व मजकुर खरोष्टी लिपीत वाचण्यास उपलब्ध आहे.)

कालसी हे गाव उत्तराखंड राज्याच्या राजधानीचे शहर डेहेराडुन पासून पश्चिमेला किंचीत उत्तरेकडे सुमारे पंचेचाळीस किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव यमुना आणि तौंस नदीच्या संगमाजवळ यमुना नदीच्या तीरावर आहे. एका बाजुला नदीतीर


आणि दुसऱ्या बाजुला हिमालयाच्या उपशाखा असलेल्या पर्वत रांगा असल्याने हा परिसर अतिशय रमणीय असा आहे.


एका भल्यामोठ्या शिळेवर पुर्व आणि दक्षिण पृष्ठ भागावर लिहीलेला असुन उत्तर पृष्ठभागावर एक हत्तीचे चित्र कोरले असुन हत्तीच्या पोटाखाली **"गजतमे"** असे ब्राह्मि लिपीत लिहीले आहे. या शिळेच्या सुरक्षेसाठी ब्रिटीश राजवटीतच शिळेवर घुमटाकार इमारत बांधली आहे व आजुबाजुस हिरवळ आणि सुंदर बाग केली आहे. चारी बाजुंनी दगडी भिंतीचे कुंपण आहे आणि या परिसराच्या प्रवेशद्वाराशी दोन्ही बाजुस दोन दगडी खांबांचे बांधकाम केले आहे. या खांबांवर सम्राट अशोकांच्या चतुर्सिंह मुद्रा विराजमान आहेत. या मुद्रा कदाचीत भारत सरकारने नंतर केल्या असाव्यात. नैसर्गिकत: रमणीय असलेल्या या परिसरात या स्थळालाही अधिकच सुशोभीत केले आहे. शैक्षणिक पर्यटन म्हणुन हे ठिकाण अतिशय उत्तम आहे. आम्ही १८ नोव्हेंबर २०१२ रोजी येथे हा शिलालेख पाहण्यासाठी दिल्ली मधील पहाडगंज या ठिकाणाहून सकाळी सहा वाजता निघालो. दिल्लीहुन मुजफ्फर नगर, सहाराणपुर मार्गे सुमारे साडे सहा तासाचा प्रवास होता. परंतु मधील प्रवास अतिशय निकृष्ट रस्त्याने झाला. एक तर आम्ही मुळ रस्ता चुकलो असु किंवा मधील एखादा मार्ग चुकलो असु. नियोजित वेळेहून सुमारे तास दीड तास उशीराने आम्ही सहाराणपुर जवळ आलो. तेव्हा आम्हाला आमचे इच्छीत स्थळ आता जवळ आले आहे असे जाणवले. त्यानंतर विकास नगर येई पर्यंत आमची दुपारच्या जेवणाची वेळ टळुन गेली होती. पुढे डाकपत्थर हे गाव लागले. डाकपत्थर मध्ये केवळ अल्पोहार घेवुन आम्ही यमुना ओलांडुन कालसी गावात आलो. या गावात शिलालेखाचे ठिकाण शोधायला मुळीच वेळ गेला नाही. मुख्य रस्त्यालगतच प्रवेशद्वाराची कमान दिसली. कमानीतुनच पुढे दुरवर यमुना नदीतीर दिसत होता तर डाव्या बाजुला डोंगररांगा दिसत होत्या. कमान द्वारातून पुढे येवुन मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजुस असलेल्या दोन चतुर्सिंह मुद्रांच्या जवळ छायाचित्र घेण्याची इच्छा डावलणे केवळ अशक्यच. तिथुन खाली चार पायऱ्या उतरुन आम्ही बागेत आलो. चार पावले चालुन आम्ही शिलालेखाच्या इमारती समोर आलो. मी सरळ जमीनाला छाती व कपाळ टेकवुन प्रणाम केला. आयुष्यात कधी या ठिकाणी येवुन ही शिळा पाहीन असे कल्पिले नव्हते. म्हणुन माझा प्रणाम हा शिलालेख लिहीणाऱ्या सम्राट अशोकाला होता, या विस्मृतीत गेलेल्या लिपीला पुन्हा संजीवन देणाऱ्या जेम्स प्रिंसेपला होता आणि शिलालेखाची संपूर्ण संहिता आम्हाला वाचण्यासाठी कागदी पुस्तकातुन सर्वप्रथम उपलब्ध करुन देणाऱ्या सर अलेक्झँडर कनिंगहॅमला होता. या शिळेचे तिन्ही बाजुंनी निरीक्षण करुन मी धन्य झालो.

सम्राट अशोकांच्या कालसी येथील शिलालेखाचे अभ्यासाच्या दृष्टीने काय महत्व आहे हे आपण वाचलेच आहे. त्या संदर्भाने कालसी शिलालेखातील पाचवा व तेरावा शिलालेख अभ्यासणे योग्य होईल. (अर्थात एक ते चार, सहा ते तेरा व चौदा शिलालेख ही महत्वाचे आहेतच पण हे शिलालेख गिरनार येथे आहेतच.)

कालसी शिलालेखात २५ व्या ओळी नंतर सर्व ओळी खुपच लांबलचक (१०० हुन अधिक अक्षरे असलेल्या) आहेत म्हणुनच वरील चित्रात शिलालेखाचे वाचन-सुलभ होण्याच्या दृष्टीने शिलालेखाच्या रेखाचित्राचे दोन भाग केले आहेत. वाचकांनी डाव्या

**कालसी शिलालेख क्र. १३ (पुर्व प्रतल)**



भागातील पहिली ओळ संपताच पुढे उजव्या भागातील पहिली ओळ वाचावी. याप्रमाणेच दुसरी, तीसरी, चौथी व पाचवी ओळ डाव्या उजव्या भागात वाचीत जावी. यथायोग्य वाचनासाठी ओळींना L1, R1, ...L2,R2...L5,R5 असे अनुक्रम पुढील पानावरील लिप्यांतरात दिले आहेत. या तेराव्या लेखाचा पुढील भाग शिळेच्या दक्षिण पृष्ठावर आहे, तो पुढील पानावर वाचता येईल.

**देवनागरी लिप्यांतरण**

(L1) अठ वसाभिसित सा देवानंपियस पियदसिने लाजिने कलिग्यं वितिता. दियढी


(R1) अ पानसतासहशे ये तुफा अपवुढेन शतेसहसमात तत हते बहुतीवतेके वा मिटे.

(L2) तता ठवा साधुन लधेसु कलिंगेसु तिवे धंमवये धंमकंमते धंमानुसथि च देवानंपियसा. जे अथि अनुसये देवानंपियसा विजितवि कलिग्यानि अविजितंहि विजिंनेमने


(R2) ए तता वध व मलिने वा अपावे हेव जनसा चे बाढी वेदंनयमते गलमते ब व देवानंपियसा. इयं पि च ततो गलुमतताले देवानंपियसा.

**कालसी शिलालेख**

**- उत्तर प्रतल**



**कालसी शिलालेख, - दक्षिण प्रतल**



(L3) सवता वसति बंभना वे सम वा पाशंड गिहिथा वा येशु विहिता ठस अगिनेसुसुसा माता-पिति सुसुसा गुलुसुसमिता स

(R3) तसहाय नातिके सुसुश भातिकास गामापटिपति दंढलितिता तेसं तेता पोति पसघाते वा वधे वा अभिलातानं वि खि निखमने.

(L4) येसं वा पि वाविहितानं सिनेहे अविपाहिने एतानं मितशंथुतासहानतिक्ये वयासनं पापनात तता सो पि त नामे उपाघाताप

(R4) पटिभागं चा एस सवमनयनं गुलमतेमा देवानंपियसा. नाथि च से जनपदे याता नाठि इमे निकाया आनंता येनेस

(L5) बंभने च समने चा नथि चा कुवा पि जनपदसि यता नथि मूनिसानं एकतलसा पि पासनिसिनो नाम पसादे. से अवता

(R5) जने तदा कलिंगेसु पि नाते चा मटवे पेपवुढ.. ब तता सतेभाग व सहसाभाग वा अज गलुमते वा देवानंपियस.

### देवनागरी लिप्यांतर (पाकृत शब्द-वाक्य)

................

...... ........... नवके इछस

सवत ....... इयम ..... लिय मदवं ति इयं वू सु.....

देवानंतपियेसा ये धंमविजय स च पेना लधे देवानंपि.....

सवेस च अतेसु अससु पि छाजने.... सतेस अते अंतियोगे नाम योने... ल चा तेना अंतियोगेना च तलि ४ लजाने तुलमये नाम अंतिकेन नाम मका नाम अलिक्यसदले नाम नीचं चोड पांडिया अवं तंबपंनिया हेवमेवा. हेवमेवा रप लाजा विश्मवसि योन कबाजेसु ने भकु नाभपंतिसं भज पितिनिकेसु अधपुलदेवु सवता देवानपियसा धंमानुचुथी अनवतंति यात पि दुत देवानंपियसि नी यंति ते पि सुतु देवानंपिनिय लववुतं माचुनं

धंमानपसथी धंम अनुविधियं अ अनुविधियि सा अचा ये.... लाच

एतकेना होति सवत विजये पितिलसे से गधा सा होति पिति होति धंमविजयंसि लहका वे खो सा पिति पालंतिक्यमेवे महफला मनंति देवानंपिये. एताये चा अठाये इयं धंमलिपी लिखिता किती पुता पायोता मे अन नव विजयम विजतविय मनिसु सयकसि नो विजय से खंति चा लंव दडतेवा लोचे प तमेव चा विजयं मनत ये धंमविजये से हिदलोकिक्य पललोकिये सवा च कु निलतिहे.... उयाम लति पा पि हिदालोकिक पललोकिक्या

### मराठी भाषांतर (१३ वा लेख संपुर्ण)

अभिषेकानंतर आठ वर्षांनी देवानांप्रिय प्रियदर्शी राजाने कलिंग जिंकले. तेथून दिड लाख प्राणी हाकलून नेले, एक लाख ठार केले आणि त्याहून अनेकपट मरण पावले. त्यानंतर आता कलिंग उपलब्धी नंतर देवानांप्रियच्या (मनात) धम्म-शील, धम्म-आकांक्षा, धम्म-अनुशासन तीव्र झाले आहे. कलिंगवर विजय मिळवून देवानांप्रिय पश्चातापित झाले आहेत. अविजयीतावर विजयी होताना तेथे लोकांचे जे वध, मृत्यू आणि अपहरण होते, ते देवानांप्रियास अतिशय वेदनाजनक आणि गंभीर वाटते. परंतु देवानांप्रियास याहून (अधिक) गंभीर वाटते कि, तेथे जे ब्राह्मण, श्रमण, अन्य संप्रदायी आणि गृहस्थ लोक राहतात, जे वृद्धांची सेवा, माता-पित्यांची सेवा, गुरुजनांची सेवा करतात, मित्र, परिचित, सहकारी, आप्त, नोकर-चाकर यांच्याशी यथा-योग्य व्यवहार करतात, त्यांचे अपघात, वध होतात, प्रियजनांपासुन वियोग होतो. अथवा (देवानांप्रियास याहून (अधिक) गंभीर वाटते की) जे लोक सुव्यवस्थित आहेत परंतु मित्र, परिचित, सहकारी, आप्त दुर्भाग्यग्रस्त झाल्याने ज्यांच्या स्नेहाची क्षति झाली आहे, त्यांच्यावरही आघात होतो. सर्व माणसांना हे सारखेच (असेच जाणवते) पण देवानांप्रियास गंभीर वाटते. एकाही संप्रदायाशी प्रसन्नता नाही असा कोणीही नाही. म्हणून जितके लोक तेव्हा कलिंग मध्ये मारले गेले, वा मेले, वा अपहृत झाले, त्याचे शतांश किंवा सहस्त्रांश देखील आज देवानांप्रियास गंभीर वाटते. (देवानांप्रियच्या मते, जो कोणी अपकार करील त्यासही क्षमा शक्य असल्यास क्षमा केली पाहिजे. -शहाबाजगढी मधील लेखान्वये)

### (पुढील पान दक्षिण पृष्ठावरुन)

(देवानंप्रिय सर्व प्राणिमात्रांचे कल्याण, संचय, नि:पक्षपात इच्छितात.)

देवानंप्रियाच्या मते हाच मोठा विजय आहे. हा देवानंप्रियाने प्राप्त केला आहे, येथे आणि सर्व शेजारी राज्यातही. सहाशे योजनांपर्यंत जेथे अंतियोग नावाचा यवन राजा आणि या अंतियोगा पल्याड ४ राजे तुरमय नावाचा, अंतिकेन नावाचा, मग नावाचा, अलिक्यसदल नावाचा आणि खाली चोड, पांडिय, तंबपनी. याचप्रमाणे या राज्यातील राजे यवन, कंबोज, नाभक, नाभपंति, भोज व पितानिक, आंध्र व पुलिंद सर्वत्र धम्म अनुशासनाचे पालन होत आहे. जेथे देवानंपियाचे दुत पोहचलेले नाहीत तेथे सुद्धा देवानंपियाची वचने, विधाने आणि धंम अनुशीलन ऐकुन प्रजाजन तसे आचरण करीत आहेत. अशाप्रमाणे सर्वत्र विजय झाला आहे. प्रीतीरसाने विजय मिळाला आहे. प्रीती धम्मविजयाने मिळते. पण हे लहान (यश) आहे. देवानंपिय केवळ परमार्थाला मोठा विजय मानतात. यासाठीच (सशस्त्र) विजयाला मानु नये तर या नवीन विजयासच मानावे. त्यांनी क्षमा आणि लघु दंडातच

स्वारस्य ठेवावे. यातच विजय मानावा जो धम्मविजय आहे. यातच इहलौकीक आणि परलौकिक आहे. हे परम आनंद दायक आहे इहलोकात व परलोकात.

सम्राट अशोकांच्या या (तेराव्या) शिलालेखाला एक अनन्य साधारण महत्व आहे. कारण याच शिलालेखामुळे सम्राट अशोकांची ऐतिहासिक काल निश्चिती होते. या लेखात आलेले भारताबाहेरील व त्या काळात जंबुद्वीपाबाहेरील ही कांही राजांच्या नावाचा उल्लेख येतो. या राजांचा आपापल्या देशातील (जागतिक इतिहासातील) इतिहासातील कालावधी विचारात घेवून सम्राट अशोकांचा काळ अचुक निश्चित करता येतो. याच शिलालेखामुळे सम्राट अशोकांच्या कलिंग युद्धाची कल्पना येते. युद्धानंतरच्या सम्राट अशोकांच्या मनस्थितीची कल्पना येते.

कालसी शिळा सम्राट अशोकांचा इतिहास आणि सम्राट अशोकांची सहृदयता सांगणारा भारतातील एकमेव पुरावा आहे. याची जपणुक आणि याचे अध्ययन भारतातील बौद्धांनाच नव्हे तर प्रत्येक नागरीकाला जरुरीचे आहे असे मला वाटते.

*- अशोक तपासे,*

संपर्क दुरध्वनी - ९९३०११२११३
९९६९११२११३




सम्राट अशोकांचे शिलालेख व स्तंभलेख यांच्या मुळ ब्राम्हि संहिता, देवनागरी लिप्यांतर आणि मराठी भाषांतर असलेले एकमेव पुस्तक ....

पियदसि राजा हेवं आहा ...

लेखक : अशोक तपासे

सम्राट अशोकांना व त्यांच्या विचारांना समजुन घेण्यासाठी अवश्य वाचा.

या साठी हे पुस्तक विनासायास पुढील इंटरनेट साईट वरुन घरपोच मागवा.

https://www.ultimateimpressions.in/product/Piyadasi_raja/

किंमत – रुपये २००/- अधिक डाक खर्च रुपये ६०/- (एकुण रुपये २६०/-)

# महाधम्मप्रचारक व बौद्धदर्शन शास्त्राचे अभ्यासक आदरणीय मा. शं. मोरे साहेब

*- अनिलकुमार पाटील, अहमदाबाद*

बौद्ध दर्शन शास्त्राचे महान अभ्यासक व धम्मप्रचारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांद्वारे स्थापित पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, माजी आयकर आयुक्त आदरणीय मानसिंग शंकरराव मोरे (मा.शं.मोरे) साहेबांचे दु:खद निधन वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी वैशाख पौर्णिमेच्या सायंकाळी ८ मे, २०१७ रोजी झाले. अखेरच्या दोन वर्षात त्यांची प्रकृती ढासळली होती. त्यांच्या जाण्याने बुद्ध धम्माचे आंदोलन व बाबासाहेबांच्या बुद्ध धम्माच्या शिक्षा कार्याला अपरिमित हानी पोहचली.

५ जुलै, १९३२ रोजी सातारा जिल्ह्यातील वाई जवळील कवठे नावाच्या गावात एका सामान्य कुटुंबात मा. शं. मोरे साहेबांचा जन्म झाला. मा. शं. मोरे साहेबांनी आपली दक्षता व योग्यतेने धम्मक्रांतीनंतर बुद्ध धम्माच्या वाङ्मयीन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. स्वत: एक उच्चपदस्थ आय.ए.एस. अधिकारी असताना सुद्धा सामान्यजणांमध्ये बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यात आदरणीय मा. शं. मोरे साहेब अग्रणी होते. त्यांच्याद्वारे लिखित, संपादित आणि अनुवादित ग्रंथसंपदा येणाऱ्या कित्येक पिढ्यांसाठी मार्गदर्शक राहणार आहेत. त्यांच्याद्वारे अनुवादित तिपिटकातील काही भागांमुळे मागील तीन दशकांपासून धम्म समजून घेणारे बौद्ध उपासक ज्ञान प्रकाशात न्हाऊन निघत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्ष १९९०-९१ साली त्यांनी पालि तिपिटकाच्या मुख्य भागांचा अनुवाद करण्याचा संकल्प केला. **अंगुत्तरनिकाय** - चार भाग, **संयुक्तनिकाय** - चार भाग, **मज्झिम निकाय** - तीन भाग, **विनयपिटक**-तीन भाग, **अभिधम्मत्थसंगहो** या ग्रंथाचा त्यांनी मराठी अनुवाद केला. त्याशिवाय वि. का. राजवाडे अनुवादित **दीघ्घनिकाय** - ३ भाग आचार्य धम्मानंद कोसंबी अनुवादित **सुत्तनिपात**, पि. वि. बापट/लाड संपादित-अनुवादित **धम्मपद** या ग्रंथाच्या अनुवादित प्रति सामान्यजणांना उपलब्ध व्हाव्या याकरिता त्याचे प्रकाशन केले. तिपिटक ग्रंथांसोबतच नवदीक्षित बौद्धांची ज्ञानतृष्णा भागविण्यासाठी त्यांनी **'जगातील बुद्ध धम्माचा इतिहास'**, **'भारतातील बुद्ध धम्माचा इतिहास,'** **'महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास'**, **'गुजरातमधील बुद्ध धम्माचा इतिहास'**, **'बौद्ध शिक्षण पद्धती'** या ग्रंथांचे स्वतंत्र लेखन केले ज्यात इतिहासाचे बुद्धकालीन आधारसूत्र आणि भारतात धम्माचा विकास त्यांनी समजावला आहे. एका संशोधकाच्या नजरेतून **'History Of Buddhism in Gujrat'** हा ग्रंथ लिहण्यासाठी त्यांनी भारतीय पुरातत्व विभागाचे ग्रंथालयच नाही तर देवनी मोरी, वल्लभी सारख्या पुरातत्वीय स्थळ आणि स्मारकाचा बारकाईने अभ्यास देखील केला. या ग्रंथांमध्ये संदर्भसूची मोठ्या प्रमाणात दिली गेली आहे. त्यामुळेच **'History Of Buddhism in Gujrat'** हा भारतासह युरोपियन देशांत सुद्धा ह्या विषयातील मान्यताप्राप्त ग्रंथ सिद्ध झाला आहे. बौद्ध तत्वज्ञानावर आधारित आदरणीय मा. शं. मोरे साहेबांद्वारे लिहिले गेलेले **'भगवान बुद्धांचा मध्यममार्ग'**, **'बुद्ध धम्माचे मूळ सिद्धांत,'** हे ग्रंथ तत्वज्ञान आणि जीवनमार्ग यांचा ताळमेळ सांगून बौद्ध उपासकांना धम्म शिकवीत आहेत. त्यांचे **'मुलांना बुद्ध धम्म कसा शिकवावा'** **'बुद्धं सरणं गच्छामि'**, **'पालि साहित्य परिचय'**, **मराठी भाषेचा उगम पालि भाषेतून'**, हे ग्रंथ खूपच उपयुक्त सिद्ध होत आहेत.

आंबेडकर इंटरनॅशनल मिशनद्वारे आदरणीय मा. शं. मोरे साहेबांनी धम्मप्रबोधन या नावाचे एक मासिक दीर्घकाळापर्यंत प्रा. विनय कांबळे आणि अशोक चक्रवर्ती यांच्या सहकार्याने प्रकाशित केले. याकरिता त्यांनी स्वत: पुण्यात प्रिंटिंग प्रेस ची स्थापना केली. पुणे, मुंबई, अहमदाबाद इत्यादी ठिकाणी धम्मकेंद्र स्थापन करुन त्यांनी तेथील सदस्यांना लेखन करण्यास प्रवृत्त केले. महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया च्या **"महाबोधी"** या विश्वप्रसिद्ध नियतकालिकात अखिल भारतीय बौद्ध उपासक संघाच्या **'अनुत्तर जनविधानात'** मध्यममार्ग- The Middle Path मध्ये त्यांचे लेख नियमित प्रकाशित होत होते.

साहेबांनी गुजरात राज्य संस्कृती विभागाद्वारे आयोजित २०१४ च्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात **"History of Buddhism in Gujrat"** या विषयावर पेपरवाचन केले. अखिल भारतीय बौद्ध उपासक संघाच्या नालंदा, नांदेड, बुद्धगया येथील अधिवेशनात धम्मप्रचारकांना मार्गदर्शन केले तसेच पूर्णा, किनवट, मनमाड इत्यादी छोट्या छोट्या शहरात आणि गावातील धम्मपरिषदा, धम्मसंमेलनांमध्ये मौल्यवान मार्गदर्शन केले. बुद्धगयेत धम्मदीक्षा समारोहात सहभाग घेऊन बहुतेकांना धम्ममार्गावर आरुढ होण्यासाठी प्रोत्साहित केले. अनेक बौद्ध देशांत जाऊन त्यांनी समकालीन बुद्ध धम्माचा अभ्यास केला. ते जेव्हा पुणे, औरंगाबाद येथे राहत तेव्हा पद्मपाणी महाविद्यालय आणि बोधगया येथे राहत तेव्हा पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात बौद्ध दर्शन शास्त्रावर त्यांची स्वत:ची ग्रंथसंपदा उपयोगी येत.

आदरणीय मा. शं. मोरे साहेब जेव्हा आयकर आयुक्त या पदावर बदली होऊन अहमदाबाद येथे आले. तेव्हा स्वत:च बौद्धसमाज कुठे राहतो ? इथे बुद्ध विहार आहे की नाही ? इत्यादींचा शोध घेत

अहमदाबाद येथे निर्माण होत असलेल्या **'पंचशिल बुद्धविहार'** जे पंचशिल बुद्ध विहार ट्रस्ट व बौद्ध समता संघ या संघटनेतील युवांद्वारे व कर्मठ कार्यकर्त्यांद्वारे निर्माण होत होते, त्यांच्याशी संपर्क साधून पंचशिल बुद्ध विहाराच्या निर्माण कार्य आणि विकासात खूपच महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वात प्रत्येक रविवारी धम्मसभेचे आयोजन होऊ लागले त्यात त्यांनी मराठी, हिंदी व गुजराती बौद्ध उपासकांना कुशलतेने एकत्र करुन धम्मसभेचे संचलन केले. त्यांच्या या अनमोल कार्यात पंचशिल बौद्ध विहाराचे ट्रस्टी आयु. शंकरराव वडे, आयु. चंद्रभान निगांवकर आणि बौद्ध समता संघाचे आयु. ताराचंद पाटील, आयु. रमेशचंद्र हाडके, आयु. अनिलकुमार पाटील, आयु. माधव फुलझेले, आयु. रावजी जाधव, आयु. गंगाराम मून व अन्य गुजराती बौद्ध उपासक आयु. मिलिंद प्रियदर्शी, आयु. सचिन प्रिचदर्शी, आयु. मनुभाई परमार इत्यादी उपासकांनी आपले अनमोल योगदान दिले. याशिवाय अशोक विजयादशमी दिनी धम्मदीक्षा कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा केले जे आजपर्यंत अविरत चालू आहे.

मळवली (जि.पुणे) येथे धम्मप्रशिक्षण विहार तसेच मुंबई स्थित अनेक विहार त्यांच्या अनमोल योगदानाची ग्वाही देतात. आदरणीय मा. शं. मोरे साहेबांनी आपले जन्मस्थळ कवडे (वाई) येथील वडिलोपार्जित जमीन बुद्ध विहार निर्माण कार्यासाठी दान दिली तसेच मुंबई येथील सर्वोदय बुद्धविहार, बावरीनगर येथील महाविहाराच्या निर्माण कार्यात महत्वाचे योगदान दिले.

तरुण कार्यकर्त्यांविषयी साहेबांना फार जिव्हाळा व अपेक्षा होत्या. पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इंजिनिअरिंग कॉलेजच्या निर्माणावेळी ते बाबासाहेबांद्वारे निर्मित रेस्ट हाऊस गोल हॉस्टेलमध्ये मुक्कामास असत. नागसेन वनातील विविध संस्थेच्या विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन त्यांनी भदन्त गुरुधम्मो थेरो यांच्या सहकार्याने यंग मेन्स बुद्धिस्ट असोसिएशन (YMBA) या संघटनेची स्थापना केली ज्याचे ते स्वत: अध्यक्ष होते.

मागील जवळ जवळ तीस वर्ष ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापना केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ट्रस्टी या पदावर होते. तसेच शेवटच्या काही वर्षात त्यांनी अध्यक्ष म्हणून देखील कार्यभार सांभाळला, औरंगाबाद येथील पि.ई.एस. पॉलिटेक्नीकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजच्या स्थापनेत आणि निर्माणात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. यासाठी ते या कॉलेजांचे निर्माण होईपर्यंत तेथेच राहिले होते आणि त्यामुळेच आज ह्या भव्य इमारती उभ्या आहेत व संपूर्ण भारतातून विद्यार्थी इथे येऊन शिक्षा प्राप्त करत आहेत. या भव्य इमारतींसमोर तथागत बुद्धांची प्रतिमा भव्य स्वरुपात स्थापन करण्याची त्यांची इच्छा मात्र अपूर्ण राहिली.

आदरणीय मा. शं. मोरे साहेब आपल्या सहधम्मचारिणीच्या (पत्नी) निधनानंतर सुद्धा लिखाण व शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत राहिले. पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाने जेव्हा बुद्धगया (बिहार) येथे कॉलेज स्थापना करण्याचा निर्णय घेतला तेव्हा तो आदेश समजून सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन बुद्धगयेत भाडे तत्वावर जागा घेऊन तेथील कार्यकर्त्यांची एक टीम तयार केली व बी.एड. कॉलेजची स्थापना केली. तेथूनच काही किमी. अंतरावर जमीन विकत घेऊन सामान्य शिक्षण व इंजिनिअरिंग शिक्षण संकुलाची स्थापना केली. दोन मजल्यांची ही इमारत बिहार आणि इतर हिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची भूक भागवत आहेत. याच दरम्यान मा. शं. मोरे साहेब अहमदाबाद येथे आले होते. पुणे येथे जेव्हा सिद्धार्थ को-ऑ - बँकेची स्थापना करण्याचा निर्णय झाला तेव्हा त्यात ही त्यांनी आपले बहुमूल्य योगदान दिले आणि काही वर्ष त्या बँकेचे अध्यक्ष म्हणून पदभार सांभाळला.

जीवनातील ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर आता माझ्याकडून धम्म आणि समाजासाठी आणखी काही होऊ शकणार नाही याची चिंता त्यांना सतावत होती तरीही **धम्मकोशाच्या सहा भागांचे व विशुद्धीमार्गाचा** अनुवाद करण्याचे कार्य ते करीत राहिले. वृद्धत्व आणि अस्वस्थता असली तरीही तथागत बुद्ध आणि बाबासाहेबांच्या प्रति समर्पण भाव त्यांना नेहमी कार्यरत ठेवत असे.

मुंबईतून आयकर आयुक्त पदावरुन निवृत्त होऊन जेव्हा ही आद. मा. शं. मोरे साहेब अहमदाबादला येत तेव्हा माझ्या निवासस्थानावरच मुक्काम करत. माझे आणि पंचशिल बुद्ध विहाराचे ट्रस्टी आयु. शंकरराव वडे यांच्यासोबत साहेबांचे पारिवारिक संबंध होते. माझी सहधम्मचारिणी पुष्पाजी पाटील, जी आयु. शंकरराव वडे यांची सुपुत्री आहे, तिला त्यांनी मुलगी मानली होती व सख्ख्या मुलीसारखे जीव लावत असे. मा. शं. मोरे साहेब आमच्या घरी असले की नेहमी आमच्या सोबत धम्म व समाजकार्य या विषयावर चर्चा व विचारविनिमय करत.

वडीलसमान आद. मा. शं. मोरे साहेब यांच्या स्मृतीला वंदन व श्रद्धा सुमन अर्पित करुन **विनम्र अभिवादन.**

त्यांचे कार्य बुद्ध धम्माच्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे सर्वदा चमकत राहील.

***मूळ लेख व संकलन - अनिलकुमार पाटील, अहमदाबाद***

***मराठी अनुवाद - अरविंद भंडारे, पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई***

# भिक्खू आणि भिक्खूणी संघ

*- डॉ. विद्यावती मालविका, "साहित्यरत्न"*

बुद्ध, धम्म आणि संघ यांना त्रिशरण म्हटले जाते. भगवान बुद्धांनी सर्वप्रथम संघाची स्थापना **"ऋषिपतन मृगदाय"** या वनात केली आणि यशकुलपुत्र यांच्या वडिलांना जगातील सर्वात प्रथम त्रिशरण ग्रहण करण्याचे श्रेय मिळाले. सर्व उपासक, उपासिका, भिक्खू तसेच भिक्खूणींना त्रिशरण ग्रहण करावे लागते. भगवान बुद्धांच्या पुर्वी या सारखा एकत्रित, संघटित असा भिक्खू संघ अस्तित्वात नव्हता. वैदिक काळात भिक्खूंच्या तुकड्या होत्या, परंतु धर्माच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांच्यामध्ये संघठितपणा नव्हता. भगवान बुद्धांचा संघ एक परिपुर्ण संघठित संस्थेप्रमाणे होते याच कारणामुळे काही विद्वानांनी हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, भगवान बुद्धांनी भिक्खूसंघाची स्थापना करणे काही नवीन नव्हते. बुद्धांनी थेट प्रजासत्ताकाच्या आधारे भिक्खूंकरिता लोकशाही ची निर्मिती केली होती. जी राजकीय संघटने प्रमाणे एक धार्मिक संघटना होती. या संघाच्या स्मृतिप्रित्यर्थ स्तुती करताना, श्री. काशी प्रसाद जायसवाल लिहीतात की, **"बौद्ध संघाच्या जन्माचा इतिहास म्हणजे संपूर्ण जगाच्या संतांच्या जन्माचा इतिहास."** म्हणून बुद्धांच्या धार्मिक संघटनेचा इतिहास भारतीय लोकशाहीच्या संघटनात्मक गर्भातून आहे. बुद्धांच्या धार्मिक संघटनेच्या जन्माचा इतिहास केवळ या देशवासीयांसाठीच नाही तर उर्वरित जगासाठी मनोरंजक असेल. श्री. जायसवाल यांनी भिक्खूसंघटनेचे महत्व सांगितले आहे ते मान्य आहे परंतु भारतीय प्रजासत्ताकाचे योगदान किंवा भेट सांगणे योग्य नाही, उचित ठरत नाही. कारण भगवंताचा भिक्खूसंघ पवित्र परिभाषेने सुसज्ज आहे. ध्यानधारकांसाठी उल्लेख केलेल्या चाळीस कम्मठ्ठानामध्ये ते काम करण्याचे एक ठिकाण आहे, कम्मठ्ठान आहे. ज्याच्या स्मरणशक्तीमुळे ज्ञानप्राप्ती मिळू शकते, ज्याची पूजा शंभर वर्षाच्या अग्निहोत्रा पेक्षा चांगली आहे. विशुद्धिमार्गामध्ये म्हटले आहे की, संघाच्या स्मृती मध्ये गुंतलेला भिक्खू म्हणजे संघाचा अभिमान आणि प्रतिष्ठा होय. त्याला श्रद्धा, आदर मोठ्या प्रमाणात प्राप्त होते त्याचे वर्चस्व प्रबळ होते. तो भिती, दु:ख आणि पीडा सहन करण्यास सक्षम होतो. संघाच्या सोबत राहण्याची तयारी ठेवतो. संघ गुनानुस्मृती समवेत राहणाऱ्या व्यक्तिच्या शरीराची पूजा संघाच्या सभागृहाप्रमाणे केली जाते. संघाच्या गुणाकडे त्याचे मन वळते, काही गोष्टींचे उल्लंघन केल्यास त्याला संघाकडे पाहण्यास संकोच वाटतो व लाज वाटते. जर त्याने ज्ञान संपादन केले नाही तर तो सुगतीस उपरा होतो, परका होतो अश्या मुक्तीकडे घेऊन जाणारा संघ म्हणजे लोकशाही चे एक अनुकरण करणे मात्र होय. भिक्खू संघटनेच्या खऱ्या व्याख्येचे उल्लंघन करणे होय. तथागतांचा श्रावक संघ म्हणजे विद्वानांचा संघ होय.

चारिकेद्वारे भगवंतांच्या संघटनेने जगाला लाभलेला पवित्र उद्देश अवर्णनीय आहे. सुरवातीला काही काळापर्यंत भिक्खुंचाच संघ होता परंतु महाप्रजापती गौतमी यांच्या प्रवज्जे नंतर भिक्खूणी संघाची स्थापना झाली होती. या दोन्ही संघांनी स्वत:चा उद्धार करताना सोबतच **"बहुजन हिताय बहुजन सुखाय"** हे महान कार्य केले. तथागतांच्या संघाचे चार वर्ग होते. भिक्खू, भिक्खूणी, उपासक, उपासिका यातील पहिले दोन वर्ग म्हणजेच भिक्खू व भिक्खूणी हे संसार त्याग करुन मुक्तीमार्गावर आरुढ झाले आणि दुसरा वर्ग म्हणजेच उपासक व उपासिका यांनी घर संसार सांभाळून, संसार त्याग केलेल्या पहिल्या वर्गाचे आधार बनले.

भिक्खू व भिक्खूणी संघामध्ये कधीच मतभेद निर्माण होणार नाही यासाठी भगवान बुद्धांनी सतत प्रयत्न केले. सर्वांनी मिळून मिसळून राहावे, याचे महत्व सांगताना प्रगती होण्यासाठी सात अतुलनीय गोष्टीचा उपदेश केला. ते सात धर्म खालील प्रकारे होते.

१) वारंवार सभा घेण्यात याव्यात.

२) संघाची कामे एकत्र येऊन, सोबत बसून करणे.

३) नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, उल्लंघन न करणे.

४) वय झालेल्या भिक्खूंचा आदर, सन्मान करणे.

५) सतत उत्पन्न व नष्ट होणाऱ्या तृष्णेच्या आहारी न जाता संयमाने राहणे.

६) आरामदायी शयनगृहात राहण्याची इच्छा न करणे.

७) आपल्या गुरुबंधु च्या सुख-सुविधेकडे लक्ष देणे.

जोपर्यंत भिक्खू या सात गोष्टींचे पालन करत राहतील तोपर्यंत ते प्रगतीपथावरच राहतील त्यांची अधोगती होणारच नाही. ह्याच गोष्टी भिक्खूणींकरिता देखील प्रगतीकारकच होत्या. भगवान बुद्धांनी संघात फूट पडली तर या विषयी खूप निंदा केली होती, तसेच संघात फूट नसेल तर मैत्री असेल त्या कारणावर प्रकाश टाकला होता. त्यांनी हे सुद्धा म्हटले होते की, जो संघात मैत्री टिकवून ठेवतो तो महान पुण्य प्राप्त करतो आणि जो संघात फूट पाडतो तो नरक यातना भोगतो, नरकात जातो. **"संघाचे एकत्रीत राहणे हे सुखकारक आहे आणि सुखकारक आहे एकत्रीत राहण्यास आग्रह करणे."**

एकत्रीत राहणारा, धर्मावर आधारित व्यक्ति आपला योगक्षेम नाश, नष्ट करीत नाही. संघात एकता केल्यामुळे तो स्वर्गात एक कल्प भर आनंदात राहतो. जो भिक्खु संघात फूट पाडतो, विभक्त होतो त्याच्यावर संघराज्याचा आक्षेप येतो. हे विधान भिक्खू भिक्खूणी करिता सुद्धा आचरणशील आहे, आचरण करण्यासाठी बंधनकारक आहे. धम्मपदा मध्ये भगवान बुद्धांनी संघातील मैत्रिकरीता सुखदायक म्हटलेले आहे.

**"सुखो बुद्धानं उप्पदो सुखा सुधम्म देसना**
**सुखा संघस्स सामग्गी समग्गानं तपो सुखो"**

(बुद्धांचा जन्म सुखकारक आहे, धम्माचा उपदेश, संघातील एकता सुखदायक आहे आणि एकत्रित तप करणे सुखकारक होय) अशा थोर भिक्खू व भिक्खूणी संघाला शरण जाऊन स्वत:चे हित करण्याचा उपदेश विमानवत्थु मध्ये दिलेला आहे जी चार शुद्ध पुरुषांची जोडी आहे आणि जे धर्मातील आठ पुरुष आहेत ज्यांना दिलेले दान महान फळ देणारे असते असे म्हटलेले आहे. त्या संघाला शरण जा.

**जनतेवर प्रभाव**

भगवान बुद्धांच्या भिक्खू-भिक्खूनी संघामध्ये सर्व जाती धर्मातील, तसेच कुळातील लोक बुद्ध धर्माची दिक्षा घेऊन सामील झाले होते. बुद्ध धर्मामध्ये जातीभेद कुळातील भेद, उच, नीच भेद किंवा वर्णभेद याला जागाच नव्हती. धर्मात सर्व समान होते. जसे की सर्व नद्यांची ओळख सागराला मिळाल्यानंतर मिटून जाते व नंतर त्या सागर म्हणूनच ओळखल्या जातात, त्याचप्रमाणे क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य, शूद्र चारही वर्णाची लोकं संघात सामील झाल्यानंतर शाक्य पुत्राचे श्रमण म्हणूनच ओळखले जात. त्यांचे पूर्वीचे नव, गोत्र, ओळख सर्व संपून जात होते. संघाचीही एक मोठी विशेषता होती. या संघामध्ये राजा-रंक, ब्राह्मण-चांडाळ सर्वांना समान आदर व सन्मान मिळत होता. हे सर्व घरदार सोडून वेगवेगळ्या परिस्थितीत प्रवज्जित झाले होते. त्यामुळे जनतेवर त्यांचा प्रचंड प्रभाव पडणे बंधनकारक होते. भिक्खू व भिक्खूणी संघाने गावा-गावात पायी चालत जाऊन चारिका करुन लोकांना सन्मार्गाची वाट दाखवली. कुठे कुठे त्यांना विरोध झालाही परंतु तो थोड्या काळासाठी, काही क्षणासाठी जेव्हा मगध राज्यातील प्रसिद्ध कुळातील कुलपुत्र भगवंताकडे येऊन भिक्खू झाले तेव्हा लोक त्यांची निंदा करीत व दु:खी होत असतं,

"श्रमण गौतम आमचा मुलगा हिरावून नेण्यासाठी आला, आमच्या मुलींना विधवा बनवण्यासाठी श्रमण गौतम आला, आमच्या कुळाचा नाश करण्यासाठी श्रमण गौतम आता आहे. आता त्याने एक हजार जटाधारींना प्रवज्जित केले." संजयच्या अडीचशे शिष्यांना सुद्धा गौतमाने प्रवज्जित केले व आपल्याकडे घेऊन गेला. आता मगधातील प्रसिद्ध कुळातील मुले सुद्धा श्रमण गौतमाकडे प्रवज्जित होत आहेत. ते भिक्खुंना बघुन या प्रतिक्रिया देत व म्हणत, (मगध च्या गिरिव्रज मध्ये महाश्रमण आला आहे, संजयच्या सर्व शिष्यांना तर नेले ओ, आता कोणाला घेऊन जाणार आहे.) परंतु जेव्हा लोकांना कळले की, तथागतांचा संघ धर्माच्या पथावर पूर्णपणे मार्गक्रमण करीत आहे तेव्हा ते प्रशंसा करणारे ठरले. **"आपले स्वागत आहे, तुमचे येणे आमच्यासाठी चांगले आहे."** मगधचा राजा बिंबीसार यांच्या पेक्षाही आयुष्यमान श्रमण गौतम सुखी आहे, श्रीमंत आहे. तेच लोक सुखी आहेत जे बुद्धाची उपासना करुन गौतमाचे शासन अंगीकारुन निरंतर धर्माचे शिक्षण घेतात.

भिक्खू तसेच भिक्खूणी संघाने बुद्धधर्माचा प्रचार-प्रसार खूप उत्साहाने तसेच मन लावून केला. लोकांवर दया, कृपा करुन त्यांना उपदेश केला. हेच कारण होते की राजा बिंबीसार, प्रसेनजित, पुक्कुसाति, चण्डप्रद्योत, उदयन, बोधीराजकुमार, शाक्य, मल्ल, लिच्छवि हे सर्व बुद्धाचे अनुयायी झाले. भिक्खू व भिक्खूणी करिता ठिकठिकाणी विहारांची स्थापना करण्यात आली. अनाथपिण्डिक, विशाखा, घोषित इ. श्रीमंतानी त्यांच्याकरीता आपले सर्वस्व अर्पण केले. त्यांच्या घराचे दरवाजे भिक्खू, भिक्खूणी करीता तसेच संघातील सर्व श्रमणांना नेहमीच उघडे ठेवण्यात आले. प्रत्येक दिवशी संघासाठी त्यांच्या घरुन भोजनदान देण्यात येऊ लागले. या संघातील प्रवज्जित झालेले लोक एकमेकांचे नातेवाईक होते, कोणी कोणाचा भाऊ, कोणी वडिल, कोणी मुलगा तर कोणी भाचा, पुतण्या आणि कोणी मुलगी तर कोणी कोणाची बहीण तर कोणी कोणाची पत्नी, सर्वजण मोठ्या श्रद्धेने धर संसाराचा त्याग करुन प्रवज्जित झाले होते. म्हणूनच त्यांचे स्वागत करणे स्वाभाविकच होते. त्यामुळे थोड्या दिवसात भिक्खू, भिक्खूणींची सदस्य संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. संपूर्ण देशात काषाय वस्त्र परिधान करुन भिक्खू व भिक्खूणी चारिका करत होते. त्यांच्या जिवन प्रभावाने लोकांनी पंचशिलेचे पालन करण्यास सुरुवात कली.

हत्या, चोरी, व्यभिचार, खोटे बोलणे तसेच मादक पदार्थ प्राशन करणे कमी केले होते. लोक धार्मिक व सदाचारी बनण्याचा प्रयत्न करु लागले. होम, हवन, यज्ञ यांच्या मार्फत होणारी जिवहत्या बंद झाली, या गोष्टींना आता लोक पाप समजू लागले होते. संघामुळे समाजातील बऱ्याच वाईट गोष्टींना आळा बसला

होता, समाजातील वाईट गोष्टी बंद करण्यास शासन करणाऱ्यांना जास्त प्रयत्न करावे लागले नाही. काही लोकांचे मत असे होते की, संघाचा लोकांवर वाईट प्रभाव सुद्धा पडला खूप परिवार तुटले, संपले, कारण आई वडील, मुलगा मुलगी, पती पत्नी यांच्या वियोगाने त्यांची मानसिकता बदलली त्यानंतर ते स्वत:ला स्वीकारु शकले नाही. देशात जे वेगळे झाले त्यांचा एक समाज तयार झाला परंतु वास्तविकतेमध्ये एकच गोष्ट खरी होती की, संघ फक्त भिक्षाटन करणारा नव्हता तर समाजात परिवर्तन करणारा ठरला. याने फक्त विरक्त लोकांचा समाजच तयार केला नाही तर संपूर्ण जगाला सदाचाराने कसे वागावे हे देखील सांगितले. लोकांचे मन पाप तसेच वाईटा कडून पुण्य व सदाचाराकडे वळवले ज्यामुळे समाजाचा उध्दार झाला आणि ह्याच कारणामुळे भारत देश विश्वगुरु बनण्यास पात्र ठरला. लोकांच्या हितासाठी संघाने आपल्याला होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करुन चारिका सुरुच ठेवली. एकदा वेरंजा इथे दुष्काळ पडला होता त्यावेळी सुद्धा कष्टाची परवा न करता सर्व त्रास सहन करुन धर्माचा प्रचार प्रसार सुरुच ठेवला. संघाची सहनशक्ती मजबूत होती सर्व त्रास संघ हसत हसत, आनंदाने सहन करत लोकांच्या हिताचा विचर करत होता. संघाच्या समोर फक्त जनतेचे हित होते. ज्याप्रमाणे भुंगा फुलाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहचवता म्हणजेच सुगंध, रंग यांना जराही त्रास न देता फुलातील रस गोळा करुन निघून जातो, त्याप्रमाणे संघाची भिक्षाटनाची पद्धत हाती. तथागतांचा हा संघ सर्व विश्वासाठी फार मोठा आदर्श होता. संघाने भारतीय समाजाचा उध्दार केला आणि संघाच्या प्रभावाने भारतीय समाजाने देखील स्वत:चा उद्धार केला व प्रगती पथावर चालण्याचा निर्धार केला तो क्षण इतिहासात अविस्मरणीय क्षणात मोजता येणारा आहे. **"संघ सरणं गच्छामि"** (मी संघाला शरण जातो) यामुळेच संघाची महानता प्रकट होते. देवता सुद्धा संघाचे दर्शन करण्यसाठी येत होते. एकदा वनात सर्व देवतांचा मोठा समूह एकत्रित झाला, आम्ही सुद्धा या अजिंक्य संघाच्या दर्शनासाठी धर्म सभेमध्ये आलो. ज्याठिकाणी भिक्खू राग, मोह नष्ट करुन प्रज्ञावान, शुद्ध होऊन परिक्रमा करीत आहेत. अश्या भिक्खू व भिक्खूणींच्या संघाचे उद्देश तसेच काय़ महान होते.

**धर्माला सांगा, प्रकाशित करा, ऋषिंच्या ध्वजाला धारण करा. सुभाषित ही ऋषिंची ध्वजा आहे, धर्मच त्यांची ध्वजा आहे.**

*मराठी अनुवाद - सुनिता गवई, पनवेल*

## पौर्णिमांचे महत्व

**पौष पौर्णिमा-** राजा बिंबीसारची धम्मदीक्षा, श्रीलंकेतील बौध्दांच्या मान्यतेनुसार तथागतांचे या पौर्णिमेला श्रीलंकेत आगमन झाले होते.

**माघ पौर्णिमा-** तथागतांनी स्वत:च्या महापरिनिर्वाणाची घोषणा केली.

**फाल्गुन पौर्णिमा-** राहुल व नंद यांची धम्मदीक्षा, शुध्दोधनाच्या निमंत्रणावरुन तथागतांचे कपिलवस्तूस आगमन.

## दिनविशेष

**१ जानेवारी** - भिमा कोरेगाव क्रांतीदिन.

**३ जानेवारी** - सावित्रीबाई फुले जयंती.

**५ जानेवारी** - भदंत डॉ. आनंद कौसल्यायन जयंती.

**६ जानेवारी** - जय भिम चे जनक बाबू हरदास एल.एन. जयंती.

**८ जानेवारी** - जागतिक बौध्द धम्म ध्वज दिन.

**२६ जानेवारी** - भारताचा प्रजासत्ताक दिन.

**३० जानेवारी** - विपस्सनाचार्य एस.एन.गोयंका गुरुजी जन्मदिवस.

**२ फेब्रुवारी** - सुभेदार रामजी बाबा स्मृतिदीन.

**१९ फेब्रुवारी** - छत्रपती शिवाजी महाराज जयंती.

**२३ फेब्रुवारी** - संत गाडगेबाबा जयंती.

**९ मार्च** - संत तुकाराम महाराज स्मृतिदीन.

**१० मार्च** - सावित्रीबाई फुले स्मृतिदीन.

**१७ मार्च** - सयाजीराव गायकवाड महाराज जयंती.

**२० मार्च** - चवदार तळे क्रांतिदीन.

**३१ मार्च** - १९९० बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न घोषित.

## व्यापाऱ्यांना बुद्ध संदेश

*- भिक्षु अश्वघोष*

आज धर्म, व्यापार, राज्यशास्त्राचे सिद्धांत आणि व्यवहार यात खूप तफावत झाली आहे, यामुळे लोक धर्माला पाखंड व्यापाराला फसविण्याचे शास्त्र तथा राज्यशास्त्राला छळ, कपट समजू लागले आहेत. वास्तविक ही अशी गोष्ट नाहीये. केवळ समाज आणि राज्याच्या दुर्व्यवस्थेमुळे लोकांचे विचार आणि हृदय संकुचित आणि संकिर्ण झाले आहे.

बुद्ध धम्मानुसार जे काही घडतं ते हेतु प्रत्ययाच्या कारणाने होत असते. एकाच्या असण्याने दुसऱ्याची उत्पत्ती होत असते. तात्पर्य हे आहे की समाज आणि आर्थिक दुर्वस्था तसेच राज्याच्या अकुशलतेमुळे आज सर्व लोकांचे अधिकाधिक सुख न होता व्यक्तिगत झाले आहे. आज व्यापार शत प्रतिशत स्वार्थ आणि लाभासाठी होत आहे न की बहुजनांच्या हितासाठी. परंतु हे सर्व भांडवलवादी देशांमध्येच होते. साम्यवादी देशात बहुजनांच्या हितासाठी होते कारण तेथे व्यक्तिगत व्यापार होत नाही, सर्व काही सार्वजनिक होते.

काही व्यापाऱ्यांनी मला विचारले की, 'पंचशील धारण केल्यावर व्यापार करु शकतो की नाही ? मी विचारले, व्यापार केल्याने कोणती हानी होते ?' ते म्हणाले, व्यापारात खोटे बोलावे लागते, त्यामध्ये लाभाचे उपाय शोधावे लागतात.

बुद्ध धम्मानुसार खालीलपैकी व्यापार सोडून बाकीचे व्यापार, उद्योगधंदे करण्यास कोणतीही बंधन नाहीत. इथे बेईमानांना कोणतेही स्थान नाही.

**बौद्धांसाठी अकरणीय व्यापार**

१) **सत्थवणिज्जा -** शस्त्रांचा व्यापार

२) **सत्तवणिज्जा -** पशुवधासाठी प्राण्यांचा व्यापार

३) **दासवणिज्जा -** दासांचा व्यापार

४) **मज्जवणिज्जा -** मद्यविक्री व्यापार

५) **विसवणिज्जा -** विषाचा व्यापार

**शस्त्रांचा व्यापार**

२५०० वर्षापूर्वी भगवान बुद्धांनी सांगितलेले उपदेश, वचन आज ही सुसंगत आहेत. आज जगात कलह यासाठी होत आहे की सर्व देश अस्त्र-शस्त्र जमा करुन त्याच्या व्यवसायातही गुंतले आहेत. तरीसुध्दा सर्वच देश विश्वशांती वर चर्चा करतात. भयानक अस्त्र-शस्त्रांचे निर्माण आणि इतर देशांना सुध्दा त्याच्या खरेदी-विक्रीत सहाय्य करणे हे विश्वात अशांतीचे वातावरण निर्माण करण्याचे कारण बनले आहे. यामुळेच निशस्त्री करणासाठी संपूर्ण जगातून साद दिली जात आहे. याबाबतीत रशियाने एक पाऊल उचलले देखील. अमेरिकेने रशियाचे अनुकरण करण्यास हवे.

यातून हे स्पष्ट होते की शस्त्र विक्री न करण्याचा बुद्धांचा संदेश किती महत्वपूर्ण आहे.

**सत्तवणिज्जा -**

बरेच लोक आज सुध्दा देवतांना बळी देण्याच्या प्रथेवर विश्वास ठेवतात. बुद्ध धम्माच्या अनुसार हिंसेसाठी कोणत्याही प्राण्यांची बळी देता येत नाही.

**दासवणिज्जा -**

मानव समाजात दासप्रथा असणे हे लज्जास्पद आहे परंतु आजच नाही तर पूर्वीपासून ही पाशवी प्रथा चालत आली आहे. आज उघडपणे पुरुषांची विक्री होत नाही. परंतु महिलांची होतच आहे. ज्यामुळे वेश्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. वुभुक्षित:कि न करोति पापं ही उक्ति साकार होते. परंतु आज चीनमध्ये या गोष्टी नाहीत. मुक्तिच्या आधी दासप्रथा आणि वेश्यांचे साम्राज्य होते.

**मद्य व्यापार**

मद्य अशी गोष्ट आहे जी मानवाला दानव बनविते. या नशेची लत लागल्यावर मनुष्यांचे जीवन सफल होत नाही. विशेषकरुन अशिक्षित समाजावर वाईट परिणाम होतो. यासाठीच आपल्या देशात मद्यनिषेधासाठी नागरिक आवाज उठवत असतात.

**विषव्यापार**

विषामुळेच आत्महत्येला प्रेरणा मिळते. जीवन राष्ट्राची संपत्ती आहे.

वरील विचारांमुळे भगवान बुद्ध वास्तविक पाहता शांतिदूताचे महामानव आहेत.

बुद्धांनी वरील व्यापार सोडून दुसऱ्या व्यापारांच्या प्रगतीचे मार्ग सुध्दा सांगितले आहेत. जर कोणी व्यापारी आपला व्यापार प्रगत करु इच्छितो तर त्यामध्ये व्यापार कुशलता आणि कुशाग्र बुद्धि सुध्दा असावी लागते.

आपणा सर्वांना अनुभव आहे की काही दुकानदारांच्या दुर्व्यवहारामुळे आपल्याला त्या दुकानदाराकडे पुन्हा जाण्याचे मन

होत नाही. बुद्ध वचनानुसार दुकानदारांनी गोड व सम्यक बोलावे तसेच त्यांनी इमानदारी सुध्दा राखावी, ज्यामुळे ग्राहक नेहमी त्यांच्याकडे येईल. फक्त गोड बोलणे पुरेसे नाही. बरेच दुकानदार असे असतात जे गोड बोलून ग्राहकांना फसवतात. उदा. ग्राहक दुकानात अनेक वस्तू पाहत असताना दुकानदार म्हणतात वस्तू घ्यायची आहे की नाही, नसेल तर पुढे जा. अशा व्यवहाराने व्यापारात उन्नति होणे कठीण असते. व्यापारांना असा व्यवहार केला पाहिजे की ज्याने ग्राहक आकर्षित होतील. घ्यायचे असेल तर घ्या नाहीतर पुढे जा असे शब्द प्रयोग करण्याऐवजी आवडली असल्यास घ्या नाहीतर परत द्या असे शब्द प्रयोग करावे.

सम्यक वाणीनेच व्यवहारात कुशतला येते. आम्ही डोळ्यांनी पाहिलं की चीन देशातील व्यापारी किती चांगला व्यवहार करतात. विदेशी समजून फसवण्याचा कुव्यवहार चिनी लोकांत नाही. तेथे सर्व वस्तूंवर किंमत लिहीलेली असते. संपूर्ण चीनमध्ये वस्तुंच्या किंमती सारख्याच असतात विभिन्न प्रांतात भिन्न किंमती नसतात काही ठिकाणी अपवादानेच हया गोष्टी पाहण्यात येतात. ते सुध्दा व्यक्तिगत दुकानात. चीनमध्ये दुकानांचे सुद्धा राष्ट्रीयीकरण झाले आहे. साम्यवादी देशात भांडवलवादी देशांसारख्या व्यक्तिगत लाभासाठी व्यापार होत नाही. साम्यवादी देशात व्यापारातून लाभ मिळवून धन कुबेर बनू शकत नाही. जितके हवे तितकेच कमावले पाहिजे. भगवान बुद्धांचे विचार सुध्दा सार्वजनिक आहेत, व्यक्तिगत नाहीत. सर्व काही बहुजनांच्या हितासाठी आहे, थोडक्यांच्या नाही.

तथागतांनी व्यक्तिपेक्षा संघाला अधिक महत्व दिले. आज बहुतेक देशांत व्यक्तिगत व्यापार ठकबाजीत परिवर्तित झाले आहेत.

दुसरी गोष्ट आहे की कुशाग्रबुद्धि असणे, व्यापाऱ्यांनी चिन्तनशील असावे. एखादी वस्तू एका किंमतीवर विकत घेऊन ती एका किंमतीला विकण्यावर इतका अधिक फायदा होईल याचा अर्थ असा नाही की ५रुपयांची वस्तू १० रुपयाला विकणे, असे ही नाही की तूपात डालडा, दूधात पाणी, साखरेत पीठ व गव्हात बाजरी टाकून लाभ मिळवणे. अशाप्रकारच्या अवैधानिक धोखेबाजीला बुद्ध धम्मात बिलकुल स्थान नाही. या प्रकारच्या बेईमानीच्या व्यापारात एकदाच लाभ मिळतो, पुन्हा नाही. लोकांचा विश्वास उडेल.

भगवान बुद्धांनी सांगितले आहे की, व्यापाऱ्यांना हे ज्ञान असणे सुध्दा आवश्यक आहे की जिथे मागणी जास्त असेल तिथे जाऊन व्यापार करायला हवा. मागणी व पुरवठ्याच्या अनुसार किंमत वाढते व कमी होते. जिथे मागणी जास्त व पुरवठा कमी तिथे किंमत जास्त व जिथे पुरवठा जास्त व मागणी कमी तिथे वस्तूंना किंमत कमी असते. या प्रकारची कुशाग्रबुद्धि असावी फसवण्याची नाही.

भगवान बुद्धांच्या मते केवळ उदरभरणा पुरते कमावणे पुरेसे नाही. कारण आणखीही आवश्यकता असतात.

बुद्ध म्हणतात

**एकेन भोगे भुञ्जेय्य द्वहि कम्मं पयोजये।**<br>
**चतुत्थं च निधापेय्य आपदातु भविस्सति।**

अर्थात व्यक्तिने आपल्या उत्पन्नाचा एक भाग उदरभरणावर खर्च करावा. दुसरा भाग आपल्या व्यापारात, कामात खर्च करावा व चौथा भाग भविष्यासाठी सुरक्षित ठेवावा.

*मराठी अनुवाद - अरविंद भंडारे*

**पियुष - रिया टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स**

**प्रोपा. प्रमोद शांताराम पोळ**

**मो. : ८६०००६३८६२**

**संपूर्ण भारतात फिरण्यासाठी**

**ऑल इंडिया परमिट गाडी**



# पालि वाङ्मयात वर्णित अर्थव्यवस्था

*- डॉ. अरविंद कुमार सिंह, गया*

पालि तिपिटकाच्या सुत्त पिटकातील दिघ निकायात अम्बष्ठ भाणनवक ने समाजाला चार वर्णात विभक्त केले आहे. ते क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र. बुद्ध पूर्वकाळापासून चालत आलेल्या परंपरेनुसार क्षत्रियांचे कार्य शासन करणे. ब्राह्मणांचे कार्य अध्ययन आणि अध्यापन करणे. वैश्य वर्णाचे कार्य व्यापार करणे व शूद्रांचे काम या तिन्हींची सेवा करणे असे होते. वैश्य वर्णाच्या अंतर्गतच श्रेष्ठी शिल्पकार, चर्मकार, लोहार, न्हावी, कुंभार, स्वर्णकार, शेतकरी इत्यादी गणना केली होती.

बुद्धकाळात अर्थव्यवस्था सामाजिक विकासाची आधारशिला होती. मानव सभ्यतेच्या विकासात मूळ रुपाने त्याची आर्थिक व्यवस्थाच प्रमुख कारण आहे. प्राचीन काळापासून तोच वर्ग सभ्यता आणि संस्कृतीचा विकास करत आहे जो कृषि योग्य मैदानी भागात अथवा पर्वतांवरील घाटात निवास करत होता तसेच जिथे नदी आणि समुद्र द्वारा व्यापारासाठी यात्रा करण्याची सुविधा उपलब्ध होती.

बुद्ध काळात सुध्दा आर्थिक व्यवस्थेचा मुख्य स्त्रोत कृषि आणि व्यापार होता. बुद्धकाळात शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. शेती नागरांनी केली जात असत. नांगर बैलानीच ओढले जात होते. शेती करणाऱ्यास कृषक (कस्सक) म्हटले जात होते मग तो कोणत्याही वर्णाचा का असेना. खुद्दक निकायातील ग्रंथ सुत्तनिपातात कसि भारद्वाज चे वर्णन आले आहे. जो पाचशे नांगरांनी शेती करण्याचे कार्य करत असे. याच कसि भारद्वाजाला भगवान बुद्धांनी आपण सुद्धा शेतकरी कशाप्रकारे आहोत याचा उपदेश दिला होता. शेतीचे कार्य मनापासून व उत्साहाने केले जात होते. शेतीच्या कामात जे उपकरण त्यावेळी प्रयोगात आणले जात होते ते मुख्यत्वे करुन नांगर, कुदळ, फावडा, खुरपा इत्यादी असतं.

बुद्ध उत्पन्न होण्यापूर्वीच्या काळी जम्बूद्विपातील राजांद्वारे ब्राह्मण वर्गाला मोठ्या संख्येने भूमि दानात मिळणाऱ्यांचे उल्लेख प्राप्त होतात. मगधाचे एक नाला गाव आणि त्याच्या जवळच खाणुमत चा ब्राह्मण कुटदन्त याला मगधराज बिंबिसार राजाद्वारे दानात भूमि प्रदान केली गेली होती. हे ब्राह्मण सुध्दा शेती करत असत. कोशल महाजनपदातील उदय नामक ब्राह्मणाला सुद्धा कोशलराज प्रसेनजीत द्वारे भूमि दानात मिळाली होती. ब्राह्मण कृषक (कस्सक) उदय ला भगवान बुद्ध म्हणतात.

**बार-बार बीज बोते है, बार-बार मेघराज बरसते है,**
**बार-बार कृषक खेत जोतते थे**

वरील उदाहरणावरुन हे स्पष्ट होते की बीजारोपणाची तैयारी विधिवत केली जात असे. गहू, ज्वार, मका, चना इत्यादींच्या पेरणीसाठी कार्तिक एवं अगहन शुक्ल पक्षाची पंचमी, षष्टी आणि सप्तमी च्या दिवशी पेरणे अधिक सोयीस्कर असत. शेतकरी लागवडी योग्य बीज खूप सांभाळून ठेवत असत. शेतीचे मुख्य अंग सिंचन असे. सिंचनासाठी तलाव, विहीर, पाणवटे इत्यादि राजा किंवा जमिनदारांद्वारे व्यवस्था केली जात असतं. शेतीच्या पेरणी सोबतच पीकांची सुरक्षा देखील केली जात असत.

बुद्ध काळात सुध्दा धान्य, ज्वारी, गहू, बाजारी, चने, राई इत्यादींची शेती केली जात. सोबतच फळांच्या बागा सुध्दा लावल्या जात.

भगवान बुद्ध एकदा भिक्खूंना म्हणतात,

भिक्खूंनो आंबे चार प्रकारचे असतात.

१) कच्चे परंतु पिकलेले दिसणारे.

२) पिकलेले परंतु कच्चे असलेले दिसणारे.

३) कच्चे आणि कच्चेच दिसणारे.

४) पिकलेले आणि पिकलेले दिसणारे.

फळांत आंबा, जांभुळ, द्राक्ष, केळी, फणस, नारळ, आवळा इत्यादी फळे भरपूर प्रमाणात असतत.

**वासे (बांबू) -** बौद्ध वाङ्मयात बांबूचा उल्लेख मिळतो. बांबूचा उपयोग घर, शिडी, बैलगाडी इत्यादी बनविण्यासाठी केला जात असे.

**वेत -** बुद्धकाळात वेताचा उपयोग सुद्धा होत होता. वेत जसा आज उपयोगी आहे तसा त्यासमयी सुध्दा उपयोगी होता.

बुद्धकाळात आर्थिक व्यवस्थेच्या अंतर्गत पाळीव पशुंचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण होते. मनुष्य व पशुमध्ये अंतर अवश्य आहे. परंतु जितके प्रेम मनुष्याने पशुंना दिले आहे तितकेच प्रेम पशुंनी सुध्दा मनुष्याला दिले आहे. शेतीकार्यात पशुंची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. पालि वाङ्मयात पशुपालनावर विशेष प्रकाश टाकला आहे. बैल नांगरणीसाठी किंवा माल ओढण्याच्या कामी येत असत. ऊंट, गाढव, घोडे, हत्ती सुध्दा माल वाहण्याचे कार्य करत असत. गाय, म्हैस, बकरी इत्यांदीपासून लोकं दूध उत्पादन मिळवत असतं. बुद्धकाळात घोड्यांचा व्यापार होत असे. घोडे रथ खेचण्याचे कार्य तसेच स्वारी साठी देखील उपयोगी येत.

बुद्धकाळात सर्व जम्बूद्विपातील जनतेचे मुख्य काम व्यवसाय होते. सोबतच अनेक व्यवसाय आणि उद्योग प्रगतशील अवस्थेत होते. हेच कारण आहे की बुद्धकाळात भारतीय जनतेचे जिवन अधिक सुखी आणि समृद्ध होते. बुद्धकाळात श्रेष्ठिंना अर्थव्यवस्थेचे प्रमुख अंग मानले जात असतं. बुद्धकालीन मगधात पांच मोठे श्रेष्ठी होते. ज्यांना कोशलराज प्रसेनजित यांनी राजा बिम्बिसार यांच्याकडे एका श्रेष्ठीला आपल्या जनपदात घेऊन जाण्यासाठी विनंती केली होती. साकेत चा श्रेष्ठी धनंजय मगधचा निवासी होता. धनंजय याने आपली पुत्री विशाखाला नऊ करोडचा महालता हार दिला होता. चम्पाचा श्रेष्ठी सोणकोटिविस हा वीस करोडचा धनी होता.

श्रावस्ती चा श्रेष्ठी अनाथ पिंडक आपल्या घरी रोज पाचशे अनाथांना भोजन देत असे. त्यानेच भगवान बुद्धांसाठी जेतवनाराम बनवले होते, ज्यांसाठी ५४ करोड स्वर्ण मुद्रा खर्च आला होता. विशारथ पूर्वाराम बनवण्यासाठी १८ करोड तसेच भिक्खू संघाला दान देण्यासाठी ९करोड असे एकूण २७ करोड खर्च केले होते.

बौद्ध संघाचा प्रमुख धुत महाकाश्यप जे मगधच्या महातीर्थ नामक गावांचे रहिवाशी होते. ते ८७ करोडचे मालिक होते. धम्म सेनापती सारिपुत्रांकडे ५०० सोन्यांच्या पालकी आणि महामोग्गलान यांच्याकडे ५०० बैलगाड्या होत्या. याव्यतिरिक्त अनेक ब्राह्मण महाशालांचे वर्णन पालि वाङ्मयात मिळते ज्यांना अट्ठ, महाअट्ठा, महाभोगा असे म्हटले गेले आहे.

बुद्धकालिन अर्थव्यवस्थेत शिल्पकारांचे महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे एका बाजूस शिल्पकला शेती द्वारा उत्पादित कच्च्या मालावर आधारीत होती तर दुसऱ्या बाजूस शेतकऱ्यांच्या गरजांना पूर्ण करत तत्कालीन ग्रामीण जीवनाला आत्मनिर्भर बनवण्यास सहाय्यभूत ठरत हाती. बुद्धकालीन व्यापार व उद्योग याच शिल्पकारांवर तसेच शेतीद्वारा उत्पादित कच्च्या मालावर अवलंबून होती.

अनेक प्रकारच्या शिल्पकलेचे विवेचन आपणास पालि वाङ्मयात सापडते, जे बुद्धकालीन अर्थव्यवस्थेचा कणा मानले जात होते. दिघ निकायाच्या सामञ्ञफल सुत्तात शिल्पकारांचे २५ प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) **हत्थारोह -** हत्तीची स्वारी करणारा.

२) **अस्सारोह -** घोड्याची स्वारी करणारा.

३) **रथिका -** रथ चालवणारा.

४) **धनुग्गहा -** धनुष्य चालवणारा.

५-१३) **दासक पुत्ता -** दास लोक

१४) **चेलका -** युद्धात विभिन्न कामे करणारा

१५) **कप्पका -** न्हावी

१६) **महापका -** स्नान करवणारा

१७) **सुपा -** हलवाई - मिठाई बनविणारा

१८) **मालाकार -** माळा बनविणारा

१९) **रजका -** कपडे धुणारा, धोबी

२०) **पेसकारा -** शिंपी

२१) **नलकारा -** वेताचे / बांबूचे वस्तू बनविणारा

२२) **कुम्मकारा -** कुंभार

२३) **गणका -** हिशोब तपासणीस / ठेवणारा

२४) **मुद्दिका -** वहि खाते लिहीणारा

२५) **अलारिका -** जेवण बनविणारा, स्वयंपाकी

वरील वर्णित पंचवीस शिल्पकारांच्या व्यतिरिक्त अन्य अनेक व्यवसाय बुद्धकाळात प्रचलित होते. ज्यांचे विवरण मगधराज अजातशत्रु यांनी केले होते. पालि वाङ्मयात वस्त्र उद्योगाची चर्चा केली गेली आहे. या उद्योगांशी संबंधित सर्वात महत्वपूर्ण शिल्प शिंप्यांचे होते. सोबतच सूत कातण्याचे कार्य देखील केले जात होते. अनेक प्रकारचे बारीक वस्त्र बुद्धकाळात बनविले जात होते.

बुद्धकाळापासूनच काशी चे मखमली वस्त्र खूप प्रसिध्द होते. काशीच्या मखमली वस्त्राशिवाय क्षौम किंवा अळशींच्या सालीचे सुक्ष्म वस्त्र कापसाचे सूती वस्त्र तसेच इतर अनेक प्रकारच्या वस्त्रांचा उल्लेख महाजन का उजातक मध्ये वर्णित आहे.

काशींच्या मुलायम वस्त्रांची ख्याती विदेशात सुध्दा प्रसिध्द होती. त्याचे मूल्य एक लाख कहापण इतके सुध्दा असतं. कपिलवस्तुच्या शाक्य जनपदाचे खोमदुस्स नगर क्षौम वस्त्रासाठी प्रसिध्द होते. कोसेय वस्त्रावर त्यासमयी सोन्याची जरी करण्याचे काम सुध्दा केले जात. रंगारी कपड्यांना रंगवण्याचे कार्य करत. रंगारी किंवा कुशल चित्रकारांद्वारा दिवाळांवर स्त्री-पुरुष, पशु-पक्षी इत्यादींचे चित्र बनविण्याचे उल्लेख आपणास पालि वाङ्मयात सापडतात. बुद्धकाळात कपडे शिवणाऱ्यास तुणकारो म्हटले जाते.

धातु काम करणाऱ्या कारागिरांना कम्मार (कमार) म्हटले जात असे. कम्मार शब्दाचा उपयोग आपणास मज्झिम निकायातील संखारुप्पति सुत्तात सापडतो, ज्याचा उपयोग सुवर्णकाराला संबोधित

करण्यासाठी केला आहे. स्वर्णकार सोन्या चांदीचे आभूषण बनवत असतं. **लोहकार -** लोखंडाचे अवजार तथा कृषि यंत्र कुऱ्हाड, ढाल, तलवार, खुर्पी इत्यादी बनविण्याचे कार्य करतं.

**दन्तकार -** हत्ती दंतापासून अनेक प्रकारच्या वस्तू बनविल्या जात. मज्झिम निकायाच्या सुकुलदायी सुत्तात उल्लेख मिळतो. एक चतुर दन्तकार हस्तीदंता पासून त्याला हव्या त्या वस्तू बनवत असतं. दन्तकार एक प्रकारच्या करवतीने आपले काम करत असतं. हस्तीदंतापासून बनविलेल्या वस्तू भारता बाहेर निर्यात देखील केल्या जात. लाकडाचे काम करणाऱ्याला सुतार म्हटले जात असत. हे लोक नांगर, खुर्ची, पलंग, टेबल, कपाट, खिडकी, दरवाजे आणि खेळणी बनविण्याचे काम सुध्दा करत असतं.

उपरोक्त शिल्पांच्या व्यतिरिक्त पालि वाङ्मयात अनेक प्रकारचे चिकीत्सक, वैद्य, आयुर्वेदाचार्य यांचेही वर्णन सापडते. शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्याला **सलकता** म्हटले जात. बुद्धकालीन मगधाचा विख्यात वैद्य जिवक कुमारभृत्य हा सर्व महाजनपदांत रोग्यांचे निदान करत असे. त्यांनी मगधराज बिंबीसार व भगवान बुद्धांवर सुध्दा उपचार केले होते. अवनिचा राजा चंडप्रद्योत यांच्या नासिका वर सुध्दा त्यांनी उपचार केले होते.

पालि वाङ्मयात नाटकातून अभिनय करणारे समज्जा सारख्या खेळाने जनतेचे मनोरंजन करत असत. रस्सीवर चालणे, बांबूवर चढून खेळ करणारे नट यांचे सुध्दा विवेचन पालि वाङ्मयात आढळते. भिन्न भिन्न शिल्पांचे काम करणाऱ्या कारागिरांचे वर्णन आपल्याला सापडते. जे बुद्धकालीन भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले जात. प्रत्येक प्रकारच्या लघु उद्योगातून राजा अथवा शासक कर गोळा करुन राज्याला सुखी समृध्द करत असे.

पालि वाङ्मयात **'मल्लाह'** चे वर्णन सुध्दा मिळते, जे होडी चालवत तसेच सागरी व्यापारात यांचे मोठे योगदान असत. हे मच्छिमारीचा व्यापार सुद्धा करत. **'गन्धी'** अत्तर विकण्याचे कार्य करत.

**कसाई -** (वधक) हे पशुंचा वध करुन त्यांचे मांस विकण्याचे कार्य करत.

**शिकारी -** हे जंगलातील पशु पक्ष्यांची शिकार करुन मांस आणि चामड्याचा व्यवहार करत.

**फेरीवाले -** ही वनवास्यांची एक श्रेणी होती, जे गरीब असून गावात, शहरांत फिरुन वस्तु, सामग्री विकण्याचे कार्य करत.

**जादूगर -** हे हातसफाईचा खेळ दाखवत. रंगमंचावर हे जादूचे प्रयोग करुन जनतेला मंत्रमुग्ध करत.

**जादूगरनी -** पालि वाङ्मयात जादूगरणीचा सुध्दा उल्लेख मिळतो.

**गणिका -** यांना जनपदकल्याणी सुध्दा म्हणत असत. वज्जि महाजनपदाची राजधानी वैशालीची जनपद कल्याणी आम्रपाली. राजगृहाची जनपद कल्याणी अवन्तीची जनपद कल्याणी या सर्व धनवान होत्या. त्या धनाच्या मोबदल्यात आपले स्त्रीत्व विकत असत.

**गान्धर्विक -** हे लोक वीणा वाजवून लोकांचे मनोरंजन करत असतं.

**मणिकार -** हे लोक विभिन्न प्रकारचे मणी व बहूमूल्य रत्नापासून आभूषण बनविण्याचे कार्य करत.

**सूदखोर -** हे लोक गरजवंतांना कर्ज देऊन त्यांच्या व्याजावर आपले उदरनिर्वाह करत असे. भगवान बुद्ध व्याजखोरीचा विरोध करत.

**योद्धा -** हे लोक शासक किंवा राजाचे सैनिक असतं. जे अस्त्र शस्त्राने राजा व प्रजेचे रक्षण करत.

बुद्धकाळात जल आणि थल दोन्ही भागांतून व्यापार चालत असे. त्याकाळात व्यापारी बैलगाडीचा उपयोग स्थळ मार्गासाठी करत असतं. तपस्सु आणि भल्लिक वर्तमान पेशावर जवळील बुद्धकालीन वाल्हिक येथील रहिवाशी होते. जे उत्कल प्रदेशातून व्यापारासाठी उरुवेला येथे आले होते. या दोन्ही व्यापाऱ्यांनी भगवान बुद्धांना लाडू दिले होते. परीणामी बुद्धांनी त्यांना द्विवचनाने प्रवज्जित केले होते. आपल्या डोक्यावरचा एक केस सुध्दा त्यांना देऊ केला होता ज्यावर त्यांनी ब्रह्मदेशात एकाच स्तूपाचे निर्माण कार्य केले.

*मराठी अनुवाद - अरविंद भंडारे*

पृष्ठ क्र. ३ च्या छपाईचा खर्च **आयु. दिलीप कोकाटे** यांच्या धम्मदानातून करण्यात आला.
पृष्ठ क्र. ४ च्या छपाईचा खर्च **आयु. वैभव वानेरे** यांच्या धम्मदानातून करण्यात आला.
पृष्ठ क्र. ५ च्या छपाईचा खर्च **आयु. साधना गांगुर्डे मॅडम** यांच्या धम्मदानातून करण्यात आला.
पृष्ठ क्र. ६ च्या छपाईचा खर्च **आयु. उबाळे मॅडम** यांच्या धम्मदानातून करण्यात आला.